। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १९० वा । बुधवार दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. यामध्ये २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. या जिल्ह्यांतील नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमिटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नुकसानग्रस्त भागातील बळीराजाला पुन्हा उभे करण्यासाठी ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जाहीर केले. या पॅकेजनुसार कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार रुपये तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. जाहीर करण्यात आलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा प्रयत्न राहणार असून ही आतापर्यंतची सर्वात मोठी आर्थिक मदत असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी देऊ केलेल्या मदतीची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंगल आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्यूही झाले आहेत. मंत्रिमंडळातील सदस्यांनी काही ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन नुकसानग्रस्तांना तातडीची १० हजार रुपयांची मदत, गहू, तांदूळ आदी देण्यात आले. यासाठी २२०० कोटी रुपयांचा पहिला हप्ता तातडीने मंजूर करण्यात आला. विमाधारक शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान स्वत: प्रयत्न करीत असून विमाधारकांव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही १७ हजार रुपये प्रति हेक्टरी इतकी रक्कम दिली जाणार आहे. या भरपाईसाठी १८ हजार कोटींहून अधिकची तरतूद केली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात एक कोटी ४३ लाख ५२ हजार २८१ हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड झाली. त्यापैकी ६८ लाख ६७ हजार ७५६ हेक्टर क्षेत्रावर अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. ज्या ठिकाणी घरांचे नुकसान झाले, तिथे नव्याने घरे बांधण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मदत करण्यात येणार आहे, तर डोंगरी भागात घरे बांधण्यासाठी अतिरिक्त १० हजारांची मदत देण्यात येईल. तसेच ज्या दुकानांचे नुकसान झाले असेल त्यांना ५० हजार रुपये, मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांसाठी तीन जनावरांची अट न ठेवता प्रति जनावर ३७ हजार ५०० रुपये तर १०० रुपये प्रति कोंबडी अशी भरपाई देण्यात येईल. जमीन खरडून गेलेली शेती पुन्हा लागवडीयोग्य होण्यासाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टरी थेट मदत तर तीन लाख रुपये मनरेगा मधून दिले जातील. बाधित विहिरींसाठी विशेष बाब म्हणून प्रति विहीर ३० हजार रुपये देण्यात येतील. त्याचप्रमाणे मत्स्यशेती तसेच बोटींच्या नुकसान भरपाईसाठी १०० कोटींची तरतूद केल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शेतकऱ्यांना मदत देताना ग्रीस्टॅकमधील माहिती ग्राह्य धरली जाईल. त्यासाठी कुठलीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी १० हजार कोटी रुपये, तसेच पूरग्रस्तांसाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या माध्यमातून १५०० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या भागात टंचाई परिस्थितीत लागू असलेल्या सर्व सवलती ओली टंचाई समजून लागू करण्यात येणार आहेत. बळीराजा वीज सवलत योजनेमुळे कृषी पंपांना आधीच वीज देयक माफ केले आहे, त्यामुळे वीज देयकाची वसूली होणार नाही.

या अभूतपूर्व संकटात मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मोठ्या प्रमाणात मदत येत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले अनेकांनी सामाजिक उत्तरदायित्व निधी देण्याचेही मान्य केले. जी मदत नियमांमध्ये बसणार नाही अशा प्रकरणी मुख्यमंत्री सहायता निधीमधून देण्यात येईल. पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्याचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आवर्जून सांगितले.

रब्बीच्या हंगामासाठी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी १० हजाराची मदत मिळणार आहे. केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर झाल्यानंतर केंद्रही शेतकऱ्यांना मदत करणार आहे. केंद्र शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी असून शेतकरी सन्मान योजनेतून मदत करीतच आहे. राज्य शासनही नमो शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून वार्षिक सहा हजार रूपयांची मदत देत आहे. या मदतीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्याला पुन्हा उभे राहण्यास निश्चितच मदत मिळणार असल्याची खात्रीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

### असे आहे पॅकेज

मृतांच्या कुटुंबीयांना: ४ लाख प्रत्येकी, जखमी व्यक्तींना : ७४ हजार रुपये ते २.५ लाख रुपये, घरगुती भांडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रति कुटुंब, कपडे, वस्तूंचे नुकसान: पाच हजार रुपये प्रतिकुटुंब, दुकानदार, टपरीधारक: ५० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट पक्क्या घरांना : एक लाख २० हजार रुपये, डोंगरी भागात पडझड, नष्ट कच्च्या घरांना : एक लाख ३० हजार रुपये, अंशतः पडझड: ६,५०० रुपये, झोपड्या: आठ हजार रुपये, जनावरांचे गोठे: तीन हजार रुपये, दुधाळ जनावरे: ३७,५०० रुपये, ओढकाम करणारी जनावरे: ३२ हजार रुपये, कुक्कुटपालन: १०० रुपये प्रति कोंबडी. निकषापेक्षा अधिकची मदत देण्यासाठी १० हजार कोटी रुपये अतिरिक्त, खरडून गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर थेट मदत आणि मनरेगाअंतर्गत तीन लाख रुपये प्रतिहेक्टर, खचलेली किंवा बाधित विहीर: ३० हजार रुपये प्रति विहीर, तातडीच्या मदतीसाठी १५०० कोटी रुपये जिल्हा नियोजन निधीमध्ये राखीव.

### दुष्काळी सवलती लागू

जमीन महसुलात सुट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेती कर्ज वसुलीला स्थगिती, शाळा, महाविद्यालय परीक्षा शुल्कात माफी, रोहयो कामात शिथिलता, शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

## क्राईम न्युज

### सोन्याचे दागिने चोरीला

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-आकाश अनिल कवडे, वय ३२ वर्षे, रा. चोंदे गल्ली कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे दि.०४.१०.२०२५ रोजी इंदापुर येथे साखर कारखान्या समोर एनएच ५२ रोडवर गाडीमध्ये झोपले असता अज्ञात दोन व्यक्तीनी आकाश कवडे यांचे गळ्यातील सहा तोळ्याचे सोन्याचे लॉकेट, एक तोळ्याची सोन्याची अंगठी, तीन ग्रॅमची सोन्याची बाळी असा एकुण ३,६५,००० किंमतीचा माल लुटून पसार झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आकाश कवडे यांनी दि.०६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०४(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अलमारी मधील रोख रक्कमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे मुबारक दगडुसाहेब सय्यद, वय ६७ वर्षे, रा. सांजा ता. जि. धाराशिव यांचे राहते घरात विष्णु रा. सांजा ता. जि. धाराशिव यांनी दि.०६.१०.२०२५ रोजी घुसुन घरातील अल्मारी मधील रोख रक्कम अंदाजे ४०,००० चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी मुबारक सय्यद यांनी दि.०६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(३),३०५ (ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीवरुन आनंदनगर पोलीसांनी तपासादरम्यान विष्णु सांजा ता. जि. धाराशिव यास ताब्यात घेवून गुन्ह्या संदर्भात चौकशी केली असता नमुद आरोपीने गुन्हा केल्याची कबुली दिली.

## अतिवृष्टीबाधित कामांच्या विशेष दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने सादर करा- जिल्हाधिकारी

धाराशिव (जिमाका) -जिल्ह्यात २१ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होऊन सार्वजनिक मालमत्तेसह शेतीपूरक व्यवसायांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.बाधित सार्वजनिक कामांच्या दुरुस्तीसाठीचे संबंधित यंत्रणांनी विशेष प्रस्ताव सादर करावेत,असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी दिले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीला विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पूजार म्हणाले की, भूम,परंडा,वाशी आणि कळंब तालुक्यांत अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे.शेतीपूरक व्यवसायाचेही नुकसान झाल्याने पशुपालकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पशुसंवर्धन विभागाने तत्काळ पाळीव जनावरांच्या लसीकरण व उपचाराची व्यवस्था करावी तसेच स्थानिक पातळीवर चारा उपलब्ध करून द्यावा.

शैक्षणिक व आरोग्य संस्था दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.अतिवृष्टीमुळे शाळा, अंगणवाड्या आणि प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांचे नुकसान झाले आहे असे सांगून श्री.पुजार म्हणाले की,त्यांच्या दुरुस्तीसाठी आपत्ती निवारण निधीतून तरतूद केली जाईल. ही कामे तातडीने हाती घ्यावीत,जेणेकरून विद्यार्थ्यांना,बालकांना व रुग्णांना होणारी गैरसोय टाळता येईल, असेही त्यांनी सांगितले.

आरोग्य विभागाने पिण्याच्या पाण्याचे स्रोत तपासावेत आणि जलजन्य तसेच साथीचे आजार उद्भवणार नाहीत यासाठी गावपातळीवर दक्ष राहून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात,असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.बैठकीत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागातील सार्वजनिक मालमत्तेच्या नुकसानीची माहितीही दिली.

## एस. टी. आरक्षणासाठी बंजारा समाजाचा लक्षवेधी मोर्चा



**लातूर /प्रतिनिधीः** बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमातीचे (एस. टी.) आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी लातूर शहरात आज सकल बंजारासमाजाच्यावतीने सोमवारी (दि.६) भव्य मोर्चा काढण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानातून निघालेल्या या मोर्चाचा जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समारोप झाला. हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती म्हणून करण्यात आला आहे. त्यामुळे त्या गॅझेटची अंमलबजावणी महाराष्ट्रातही व्हावी आणि समाजाला एस. टी. आरक्षणाचा लाभ मिळावा, अशी मागणी मोर्चा दरम्यान करण्यात आली.

सोमवारी सकाळपासूनच लातूर शहरात बंजारा बांधव व भगिनी या मोर्चासाठी येत होते. बंजारा समाजांच्या बांधवांनी मी बंजारा असा मजकूर असलेल्या पांढऱ्या टोप्या परीधान केल्या होत्या. बंजारा भिगीनींनी पारंपारीक वेषात आपला सहभाग नोंदवला होता. त्यांचा सहभाग उल्लेखनीय होता त्यांच्या हातात मागण्यांचे फलक होते.

बंजारा समाजास अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करा असे फलक दिसून येत होते. या मोर्चात तरुणांचा उत्साह आणि महिलांचा सहभाग लक्षवेधी होता. शांततेत पण ठाम निर्धाराने निघालेल्या या मोर्चातून समाजाने आपल्या न्याय्य हक्कासाठीचा आवाज बुलंद केला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोराप या मोर्चास अनेकांनी संबाधीत केले. देशातील अन्य राज्यांचा दाखला देत महाराष्ट्रात बंजारा समाजाप्रति होत असलेला दुजाभावाबद्दल यावेळी वकत्यांनी नाराजी व्यक्त केली व बंजारा समाजाची ही मागणी मान्य होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही असा इशाराही यावेळी मोर्चेकऱ्यांनी दिला.


# तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.

## तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा

## तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल **(https://udgam.rbi.org.in)** पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

ऑक्टोबर ते डिसेंबर 2025 दरम्यान देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या दावा न केलेल्या संपत्तीच्या खास शिबिरांमध्ये भेट द्या




अधिक माहितीसाठी भेट द्या:
**https://rbikehtahai.rbi.org.in**
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: **rbikehtahai@rbi.org.in**
क्यूआर कोड स्कॅन करा
**अधिकृत व्हॉट्सअॅप नंबर 99990 41935**

जनहितार्थ जारी
भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्यासाठी सर्वांनी मदत केली पाहिजे

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अतिवृष्टीग्रस्तांना मदतसाठी भरघोष मदतीचा विचार करीत आहोत असे सांगुन त्यांनी सहकारी उपमुख्यमंत्री यांच्या समावेत विचार चालू असल्याचे सांगितले. सरकार म्हणून आम्ही मदत करू मात्र साखर कारखान्यांनी जी भुमिका घेतली आहे यावर त्यांनी टिका केली आहे. त्यांना जो राग आला तो योग्य आहे. साखर कारखाने व शेतकरी यांचा जवळचा संबंध आहे. एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हटले तरी चुकीचे ठरणारे नाही. मुख्यमंत्री यांनी म्हटले आहे की, सहकारी कारखान्यांचे मालक कारखानदार नसून शेतकरी आहेत, असे त्यांनी ठामपणे सांगितले. ते म्हणाले की, अरे तुम्ही मालक नाहीत तर कारखान्याचे मालक आमचा शेतकरी आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्याच्या पाठीशी उभा राहण्याचे काम सरकार करेल. साखर कारखान्यांनी नफ्यातून शेतकऱ्यांसाठी मदत निधी बाजूला काढण्यास नकार दिल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी टीका केली. शेतकऱ्यांसाठी बाजूला ठेवण्यास सांगितलेला निधी हा कारखान्याच्या नफ्यातून मागितला होता, तो शेतकऱ्यांच्या एफआरपीतून नव्हे, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. एफआरपीतून मागितले नव्हते, एफआरपीतले पैसे हे शेतकऱ्याचे आहेत, नफ्यातले पैसे कारखान्याचे आहेत, असे त्यांनी सांगितले. यावर मुख्यमंत्री न थांबता त्यांनी शेतकऱ्याला मदत करायला त्यांच्यात दानत नाही असे कठोर बोल केले. यापुढेही जाऊन त्यांनी शेतकऱ्यांचा काटा मारून (वजनामध्ये फसवणूक) काही कारखाने पैसे जमा करतात, पण शेतकऱ्याला मदत करायला त्यांच्यात दानत नाही, असा आरोपही त्यांनी केला. तुम्ही शेतकऱ्याचा काटा मारून मारून पैसा जमा करता आणि शेतकऱ्यांसाठी २५ लाख रुपये द्या म्हटले तर तुम्हाला देण्याची दानत नाही, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, जे लोक आमच्यावर टीका करत आहेत, त्यांना सांगतो एकदा आरशात बघून घ्या. तुम्ही असताना तुम्ही काय केले हे एकदा आरशात बघा त्याच्यानंतर आमच्यावर टीका करा. आम्हाला खुर्च्या तोडण्यासाठी लोकांनी पाठवलेले नाही, शेतकऱ्यांची सेवा करण्यासाठी पाठवला आहे आणि ते केल्याशिवाय आम्ही थांबणार नाही. त्यांनी उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यामध्ये आणून नगर, नाशिक आणि मराठवाड्यापर्यंतचा भाग दुष्काळमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. वास्तविक त्यांनी टिका केली आहे ती योग्य का अयोग्य यात न जाता त्यांचे आवाहनास साथ दिली पाहिजे. मुळात साखर कारखाने कोणाचे आहेत. या थोडी नजर टाकली तर श्रीमंत व्यक्ती बरोबर, आजी व माजी आमदार व मंत्र्याचे आहेत. हे तरी मान्य केले पाहिजे. दुसरे असे की, वजन काट्या बाबत विचार व्यक्त केले. प्रत्येक बाबातीत पारदर्शिकता आहे मग वजनाबाबतच का नाही? बाहेर वजनास विरोध का केला जातो हे अजून न समजलेले कोडे आहे. यामुळे शंका घेण्यात वाव मिळतो. मुळात तसे पाहिले तर साखर कारखाने तोट्यात नसतात असे दिसून येते. एक तर शेअर्स जमा होतो तो गणपतीची पावती म्हणजे वर्गणी फाडल्या सारखे आहे. एका काय ते वीस-पंचवीस हजार शेअर्स म्हणून भरले की, पुन्हा त्यांचे व्याज मिळतेचे असे नाही. सभासद म्हणून साखर दिली जाते तीही कमी दरात. बाकी शेअर्सला काय फायदा? ही बाब विचार करायाला लावणारी आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यामुळे साखर कारखाने चालतात. ऊसच उत्पादित केला नाही तर कारखाने कसे चालणार! त्यामुळे शेतकरी हा महत्वाचा घटक आहे. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहास साथ दिली पाहिजे. त्यांनी शेतकऱ्याच्या मदतीसाठी आवाहन केले आहे. मुळात तसे पाहिले तर आपल्या भागातील ऊस उत्पादक, सभासद त्याच प्रमाणे आपल्या परिसरातील शेतकऱ्यास मदत केली पाहिजे. सर्व बाबी सरकार करेल म्हटले तर शक्य नाही. सरकारची आर्थिक स्थिती पाहाता ते शक्य नाही. त्यामुळे सरकार भरघोष मदत करीत नाही. तुटपुंजी मदत करते. त्यामुळे सरकारवर टिका होते. ही वस्तूस्थिती समजून घेतली पाहिजे. कृषी बाजार समित्या असोत किंवा साखर कारखाने असोत त्यांनी पूरग्रस्त शेतकऱ्यास मदत केली पाहिजे. ते त्यांच्याकडून शक्य आहे. शेतकरी हा तक्रार करणारा व्यक्ती नाही. ऊसाला जो भाव मिळतो तोच घेतात. साखर कारखाने जो भाव जाहिर करतात तो एकरकट्टा म्हणजे एकरकमी देत नाहीत तर त्याचे हिस्से तुकडे केले जातात. पहिला हप्ता, दुसरा तसेच अंतिम हप्ता अशा तुकडया पद्धतीमुळे शेतकऱ्याची एकप्रकारमुळे आर्थिक बाजू कमकुवत होते. एकादमात पैसा खात्यात जमा झाला तर विंधन विहिर, टॅक्टर खरेदी, शेतात माती टाकणे आदि कामे करता येतात. एकतर सरकारकडून मोठ्या प्रमाणात मदत घेतली जाते व दुसरी बाब म्हणजे शेतकऱ्यांना भरघोस मदत दिसून येत नाही. त्यामुळे आज शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा स्थितीत मदत करणे योग्य ठरणारे आहे. काही व्यक्ती आपल्यापरिने मदत करताना दिसून येत आहेत. एकतर सध्याला शेतात पाण्यात सोयाबिन आहे. ते हाती लागेल असे वाटत नाही. त्यामुळे शेतकऱ्याकडे सोयाबिन नाही भाव चांगला कधी न मिळालेला यावर्षी मिळणार आहे. शेतकऱ्याकडे नसलेल्या पिकांना भाव चांगला मिळतो. अशा दुष्टचक्रात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे काही केले तरी मदत ही केली पाहिजे. सर्व सहकार क्षेत्रातील बाबी आहेत. मग साखर कारखान्याबरोबर बँका आहेत. जे काही सहकार क्षेत्रातील क्षेत्र असेल त्यांनी मुख्यमंत्री आपत्तीग्रस्तफंडा मदत केली पाहिजे. शेतकऱ्याचा पैसा किंवा सभासदाचा पैसा कामी आलेला असतो. त्यामुळे कामी आलेल्या नफ्यातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनास साथ दिली पाहिजे. तसे पाहिले तर सरकारच्या ताब्यात सहकार खाते असते, केंद्राकडे खाते आहे. अमित शहा कामकाज पाहतात. त्यांनी सुद्धा साखर कारखान्याकडे अपिल केले तर राज्यातील शेतकऱ्यावर आलेले संकट दूर करण्यात मदत होणार आहे. काही झाले तरी राज्यात अतिवृष्टीने उदभवलेली स्थिती भयाण आहे. शेतकरी जर पुन्हा उभारी घेतली नाही तर मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागणार आहे. जेवढी काही सरकार सेंक्टर आहेत त्यांपी मदत केली पाहिजे.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला वाढती पसंती

## गेल्या ३ महिन्यांत २ लाखांवर ग्राहकांचा सहभाग
## लातूर परिमंडळातील २३ हजार ग्राहकांचा समावेश
## पर्यावरणस्नेही ७ लाखांवर ग्राहकांना ८ कोटींचा फायदा

**लातूर /प्रतिनिधी :**वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या गो-ग्रीन योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये राज्यातील तब्बल २ लाख ३ हजार ३४० वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे. यामध्ये लातूर परिमंडळातील २३ हजार ३२७ वीजग्राहकांचा समावेश आहे.

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ इमेल व एसएमएसचा पर्याय निवडून सोमवार (दि. ६) पर्यंत राज्यभरातील लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही ७ लाख ६ हजार ९२४ ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहेत व त्यांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये लातूर जिल्हयातील १० हजार १९२, धाराशिव जिल्हयातील ५२८४ तर बीड जिल्हयातील ७ हजार ८५१ वीजग्राहकांचा समावेश आहे.

'गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे', असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे.




गेल्या तीन महिन्यांत २ लाखांवर ग्राहकांचा सहभाग वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये २ लाख ३ हजार ३४० ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील ८७ हजार ४० ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील ७८ हजार ८२९ ग्राहकांचा समावेश आहे. या योजनेत आतापर्यंत ७ लाख ६ हजार ९२४ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा ) पुणे प्रादेशिक विभागात सर्वाधिक २ लाख ८८ हजार २३८ (३.४६ कोटी), कोकण- २ लाख ६२ हजार २३७ (३.१५ कोटी), नागपूर प्रादेशिक विभाग- ८४ हजार ५३१ (१.०१ कोटी) आणि छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागामध्ये योजनेत सहभागी ७१ हजार ९१८ वीजग्राहकांना ८६ लाख ३० हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

असे व्हा योजनेत सहभागी गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा - महावितरणकडून गो-ग्रीनचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. यात ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत इमेलवर व मोबाईल एसएमएसद्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे सर्वोच्च न्यायालयात घडलेल्या घटनेचा तीव्र निषेध

**लातूर /प्रतिनिधी :** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयात बूट भिरकान्यात आल्याच्या घटनेचा महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महिला विधिज्ञांची तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्वोच्च न्यायालयात घडलेल्या या घटनेबद्दल संताप व्यक्त करून निषेध करण्यात आला. न्या. भूषण गवई यांनी घडल्या प्रकाराबद्दल संबंधित व्यक्तीला माफ केले असले तरी संविधान आणि पर्यायाने लोकशाही मूल्य




नाकारणाऱ्या प्रवृत्ती देशात वाढू नयेत याची दक्षता घेणे, लोकशाहीचा कोणताही स्तंभ कमकुवत होणार नाही याची काळजी घेणे आता काळाची गरज असल्याचे मत ॲड. जयश्री पाटील यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

या प्रसंगी ॲड. किरण चिंते, ॲड. बबिता संकाये, ॲड. सुरेखा बेलुरे , ॲड. अरुणा वाघमारे, ॲड. बिना राऊत, ॲड. वसुधा नाळापूरे, ॲड. प्रिया चव्हाण, ॲड. अभिलाषा गवारे, ॲड. शितल कांबळे, ॲड. रेश्मा सय्यद, ॲड. सुजाता खोबरे, ॲड. चारुशीला बिराजदार, ॲड. कांचन वाघन्ना, ॲड. सुनंदा जाधव, ॲड. मनिषा दिवे, ॲड. सोफिया शेख, ॲड.तृप्ती इटकरी , ॲड.कीर्ती जाधव, ॲड. सुरेखा जानते, ॲड. पद्मा परमा , ॲड. सविता राठोड आदी महिला वकीलांची उपस्थिती होती.

# राजा नारायणलाल लाहोटी स्कूलमध्ये येथे स्वरपोर्णिमा मासिक सभेचे आयोजन



**लातूर /प्रतिनिधी :** येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये स्वर पोर्णिमा मासिक सभेचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी अभय शहा, यांच्या शुभहस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

राजा नारायणलाल लाहोटी सीबीएसई स्कूलमध्ये कोजागिरीनिमित्त स्वरपोर्णिमा या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या संगीत विभागातर्फे मासिक संगीत सभा संपन्न होणार आहे. स्वर पौर्णिमा या मासिक संगीत सभेचे उद्घाटन कोजागिरीच्या निमित्ताने करण्यात आले. याप्रसंगी उद्घाटक म्हणून अभयजी शहा उपस्थित होते. लातूर नगरीत दर महिन्याला होणाऱ्या आवर्तन या संगीत सभेच्या प्रेरणेने सुरूवात झालेल्या या सभेतून विद्यालयातील नवोदित विद्यार्थी गायक कलावंत घडतील याच उद्देशाने ही स्वर पौर्णिमा मासिक संगीत सभा होईल असा विश्वास आहे , असे गौरवोद्गार अभयजी शहा यांनी उद्घाटन प्रसंगी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

मी राधिका..... या उन्नती मुंडेच्या सुमधुर गाण्याने वातावरण प्रफुल्लित झाले.दिया अग्रवाल हिने गायलेल्या छोटी छोटी गय्या... या गीताने वातावरण भारून गेले. रूही भुतडा हिने गायलेल्या कानडा राजा पंढरीचा या गीताने संपूर्ण आसमंत विठूमय झाला होता. संगीत हे थकलेल्या मनाला विसावा देते तर भारलेल्या वातावरणात आनंद निर्मिती करते. असे प्रसन्न वातावरण.... विद्युत दिव्यांच्या प्रकाश झोत... तर कौमुदीत मिसळलेल्या संगीताच्या सुरांनी रसिक मनावर अधिराज्य गाजवले. याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन आनंदजी लाहोटी , प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू , माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्व्ही , सर्व शिक्षक पालक उपस्थित होते. स्वर पौर्णिमेचे सूत्रसंचालन विद्यालयाचे संगीत शिक्षक कौस्तुभ जोशी यांनी केले. शिरीष देशपांडे यांनी तबल्याची साथ दिली. आठवी वर्गातील वीरनाथ डोंगरे याने तबल्याचा ठेका धरून उपस्थितांची मने जिंकली. सुरसंवादिनीवर गीता मुंडे यांनी साथ केली.या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीत शिक्षक श्री कौस्तुभ जोशी यांनी तर आभार प्रदर्शन संगीत शिक्षक शिरीष देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, कॅप्तन बी के भालेराव, आशीद बनसोडे, संदीप केंद्रे ,गीता मुंडे , सुनील मुनाळे, विवेक डोंगरे, ज्ञानेश्वर यादव, मयूर पोतनीस, व्यंकटेश इबित्दार, मंगेश रंकाळे, नितीन पुंड, गजानन सोनी, अमृत पालवे, विकास बनसोडे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार यवनगे यांनी योगदान दिले

प्रसंगी उपस्थित शाळेचे चेअरमन आनंदजी लाहोटी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू व इतर मान्यवर उपस्थित होते.

# दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी मध्ये अ विभागीय खो-खो स्पर्धेचे आयोजन



**लातूर /प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अ विभागीय' मुलं-मुलींच्या खो-खो स्पर्धा दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. वाजिद चाऊस उपस्थित होते. मुलांच्या खो-खो स्पर्धेचे उद्घाटन स्वा. रा. ती. म. वि., नांदेडचे सिनेट सदस्य मा. डॉ. महेश बेंबडे यांनी केले. तर मुलींच्या खो-खो स्पर्धे चे उद्घाटन अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू आणि तालुका क्रीडा अधिकारी, लातूर मा. सारिका काळे यांच्या हस्ते करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल मा. सचिन गिरी, सहकारी प्रा. निशिकांत सदाफुले, स्वा. रा. ती. म. वि., नांदेडचे क्रीडा अभ्यास मंडळाचे अध्यक्ष मा. डॉ. कैलास पाळणे आणि सदस्य मा. डॉ. भास्कर रेड्डी, डॉ. प्रशांत चव्हाण, डॉ. चिंते, प्रा. हालसे यांची उपस्थिती लाभली.या स्पर्धेसाठी निवड समिती गठित करण्यात आली होती. समितीचे अध्यक्षपद कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, लातूर महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका मा. डॉ. वैशाली माडेकर यांनी भूषविले, तर सदस्य म्हणून प्रा. बालाजी हालसे आणि डॉ. भास्कर रेड्डी यांनी कार्यभार सांभाळला.उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्रा. अरुण कोंडापुरे, प्रा. रोहित उसनाळे, प्रा. अविनाश चौधरी तसेच क्रीडा शिक्षक ऋषिकेश मस्के उपस्थित होते.

# अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे: ए बी आर एस एम संघटनेची मागणी



**लातूर /प्रतिनिधी :**मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे व उद्भवलेल्या पूरस्थितीमुळे दैनंदिन जीवनातील गरजा भागविणे नागरिकांना अवघड झालेले आहे अशा परिस्थितीत नांदेड विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेचे हजाराच्या घरात परीक्षा शुल्क भरणे अशक्य झालेले आहे अशा परिस्थितीत त्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे ही मागणी निवेदनाच्या माध्यमातून अखिल भारतीय शैक्षिक महासंघ लातूरचे जिल्हाध्यक्ष प्रो. डॉ. शरद निलंगेकर यांनी मा. कुलगुरू स्वा .रा.ती .म. विद्यापीठ नांदेड यांना विद्यापीठ उपकेंद्राचे संचालक प्रो.मंगेश शिंदे यांच्यामार्फत दिले यावेळी संघटनेचे सहसचिव डॉ. मनोहर चपळे कुलकर्णी सर प्रा. डॉ. उर्मिला धाराशिवे प्रा. मालपाणी सर प्रा. षटकार सर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या मागणीला विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा वाढता पाठिंबा मिळत आहे.

# माजी सैनिकांनी कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** पुणे येथील ज्ञानदीप समाज विकास संस्था यांच्या संचलनाखालील पुणे येथील करिअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट येथे माजी सैनिकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात आहे. माजी सैनिकांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असल्यास त्यांना फोनद्वारे समुपदेशन करून प्रशिक्षण दिले जाईल, अशी माहिती करिअर डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे यांनी दिली आहे.

तरी ३५ ते ४० वयोगटातील इच्छुक माजी सैनिकांनी आपले डिस्चार्ज बुक आणि ओळखपत्र घेऊन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

# नाशकात निवृत्त महिला अधिकाऱ्याची निर्घृण हत्या, पोटच्या मुलानेच पाडले रक्ताच्या थारोळ्यात

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिक शहर पुन्हा एकदा हत्येच्या घटनेने हादरले आहे. आज पहाटे नाशिक शहरात एका तरुणाची देवदर्शनाला जाताना हत्या करण्यात आली होती. हत्येची ही घटना ताजी असताना अवघ्या पाच तासांत नाशकात हत्येची दुसरी घटना घडली आहे. इथं एका तरुणाने आपल्या जन्मदात्या आईवर चाकुने वार करून हत्या केली आहे. एकाच दिवसात शहरात अशाप्रकारे हत्येच्या दोन घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मंगला घोलप असे हत्या झालेल्या ४५ वर्षी महिलेचं नाव आहे. त्या सेवानिवृत्त विस्तार अधिकारी असल्याची माहिती समोर येत आहे. मंगला घोलप यांचा मुलगा स्वप्नील घोलप याने आपल्या आईवर धारदार शस्त्राने वार करत त्यांची हत्या केली. घटनेची माहिती मिळताच सातपूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून तात्काळ आरोपी स्वप्नील घोलप यास ताब्यात घेतले आहे.

आईच्या खुनाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सातपूर पोलीस सध्या गुन्हा नोंद करण्याचे काम करत असून, या घटनेमागील नेमके कारण आणि तपशीलवार तपास करत आहेत. अवघ्या काही तासांत दोन खुनामुळे नाशिकमधील कायदा आणि सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाढत्या गुन्हेगारीवर तातडीने नियंत्रण मिळवण्याचे आव्हान पोलीस प्रशासनासमोर उभे राहिले आहे. विशेष म्हणजे गेल्या काळात नाशिक शहरासह आसपासच्या परिसरात हत्येच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागल्या नऊ महिन्यातील ही ४५ वी हत्या आहे.

# कार्डिओ व्यायाम करताना या चुका टाळा!

मुंबई : वजन कमी करायचं असो किंवा हृदयाचं आरोग्य राखायचं असो, अनेकजण कार्डिओ हा व्यायाम प्रकार निवडतात. पण अनेकदा उत्साहाच्या भरात किंवा चुकीच्या माहितीमुळे लोक काही अशा चुकांमध्ये अडकतात, ज्या त्यांच्या शरीराला फायद्याऐवजी नुकसान पोह-ोचवू शकतात.नियमित शारीरिक हालचाल ही संपूर्ण शरीराच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक असते, मग ते हृदय असो, मेंदू, हाडं किंवा स्नायू. व्यायामामुळे मानसिक आरोग्यही सुधारते आणि ऊर्जा वाढते. त्यामुळे सध्या बरेच लोक फिटनेसकडे वळले असून, कार्डिओला प्राधान्य देताना दिसतात. पण हा व्यायाम करताना काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे.



कार्डिओ करताना होणाऱ्या सामान्य चुका

१) अतिरिक्त वेगाने सुरुवात करणे

खूप जण व्यायामाची सुरुवात करताच थेट जास्त वेगाने धावू लागतात किंवा हाय-इंटेन्सिटी वर्कआउट करतात. पण हे शरीरासाठी धोकादायक ठरू शकतं. वेग हृदयगतीच्या ७०-८०% पातळीवर अचानक पोहोचल्याने थकवा, दम लागणे किंवा इतर त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कार्डिओ करताना गती हळूहळू वाढवणं आवश्यक आहे.२) नेहमी एकाच प्रकारचा कार्डिओ करणेरोजच एकच व्यायाम, जसं की फक्त ट्रेडमिलवर धावणे असे केल्याने शरीराला सवय होते आणि परिणाम कमी होतो. शिवाय कंटाळाही येतो. त्यामुळे धावणे, सायकल चालवणे, जलद चालणे किंवा झुंबा यासारख्या वेगवेगळ्या प्रकारांचा समावेश करा.

३) अत्याधिक कार्डिओ करणे

जास्त केल्याने जास्त फायदा ही संकल्पना व्यायामात लागू पडत नाही. काही जण तासन् तास कार्डिओ करतात, पण त्यामुळे स्नायूंवर ताण येतो आणि त्यांची झीज होते. व्यायामाच्या तीव्रतेनुसार ३०-४० मिनिटांपर्यंत कार्डिओ पुरेसं असतं.४) फक्त कार्डिओवर लक्ष केंद्रित करणे

काही लोक फक्त कार्डिओ करून वेट ट्रेनिंगला दुर्लक्ष करतात. पण वेट ट्रेनिंगसुद्धा आवश्यक आहे. ते मसल्स मजबूत करतात, हाडं बळकट करतात आणि शरीराचा एकूण स्टॅमिना वाढवतात. त्यामुळे आठवड्यातून किमान २-३ दिवस स्ट्रेंथ ट्रेनिंग करणं फायदेशीर ठरतं. कार्डिओ करताना योग्य पद्धत वापरणं हेच शरीरासाठी फायद्याचं ठरतं. गती नियंत्रण, विविधता, संतुलित वेळ आणि स्ट्रेंथ ट्रेनिंगचं योग्य मिश्रण यामुळे तुम्हाला हवेसे फिटनेस परिणाम मिळू शकतात, तेही दुखाप-

# झोप न लागण्याची समस्या?

मुंबई : खरंतर, हल्लीच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे झोपेच्या समस्या खूपच वाढल्या आहेत. चुकीच्या खाण्याच्या सवयी, असंतुलित दिनचर्या आणि सतत डोक्यात चालणारे विचार यामुळे झोप लागणे कठीण होते. यावर उपाय म्हणून अनेक औषधं आणि थेरपी वापरली जातात, पण काही साध्या आणि नैसर्गिक गोष्टींनीसुद्धा झोपेची गुणवत्ता सुधारता येते. खाली दिलेले उपाय नियमितपणे केल्यास झोपेसंबंधी असलेल्या अडचणी दूर होऊ शकतात:

झोपण्यापूर्वी आंघोळ करा

रात्री झोपण्याआधी कोमट पाण्याने आंघोळ केल्याने शरीर आणि मन दोन्ही शांत होतात. दिवसभराचा थकवा, मानसिक ताण दूर होतो. केवळ स्वच्छतेसाठीच नव्हे तर शरीरातील उष्णता आणि तणाव कमी करण्यासाठी रात्रीची आंघोळ फायदेशीर ठरते.

जेवल्यानंतर लगेच झोपू नका

रात्रीचं जेवण झोपण्याच्या किमान ३-४ तास आधी करावं. विशेषतः जड अन्न घेतल्यास पचनक्रिया सुरळीत होण्यासाठी वेळ द्यावा लागतो. लगेच झोपल्यास गॅस, अपचन आणि झोपेत अस्वस्थता जाणवू शकते.

दिवसाच्या शेवटी स्वतःशी संवाद

झोपण्याआधी थोडा वेळ स्वतःसोबत घालवा. आजचा दिवस कसा गेला याचा विचार करा. काही चुका झाल्या असतील तर त्या सुधारण्याचा निर्धार करा. आयुष्याचं मोल आणि वेळेचं महत्त्व याची जाणीव ठेवा. त्यामुळे मानसिक स्पष्टता आणि समाधान मिळतं.



झोपताना विचार आणि वस्तू बाजूला ठेवा

झोपताना मन शांत ठेवणं महत्त्वाचं आहे. दिवसभर जे काही मनात साठलेलं असतं, ते सर्व बाजूला ठेवण्याचा प्रयत्न करा. मोबाईल, लॅपटॉप, कामाचं दडपण किंवा कुठलेही विचार दूर ठेवून झोपायला जा. शांत झोपेसाठी ही एक सोपी पण प्रभावी सवय आहे.

डोक्याची दिशा योग्य ठेवा

झोपताना डोकं उत्तर दिशेला ठेवू नये. अशा स्थितीत झोपल्यास शरीरातील रक्तप्रवाह मेंदूकडे वाढतो आणि त्यामुळे झोप अशांत होऊ शकते. शक्यतो डोकं दक्षिण किंवा पूर्वे कडे ठेवणं अधिक उपयुक्त ठरतं.

झोप ही केवळ शरीराची गरज नसून, मनाचीही विश्रांती आहे. वरील साधे उपाय आपल्या दैनंदिन जीवनात सहज स्वीकारता येतील आणि कोणतीही औषधं न वापरता झोपेची समस्या दूर करता येऊ शकते.

जर तुमची झोप सुधारली, तर तुमचं आरोग्य, मन:शांती आणि एकूण जीवनमान निश्चितच अधिक सकारात्मक होईल.

# पाकिस्तानला कडक संदेश



पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या गोळीबारात अनेक नागरिक ठार झाले. मुझफ्फराबाद, मिरपूर, धीरकोटसह सर्वच भागांत निदर्शनाचे लोण पसरले. नागरिकांना रोखण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने पुलावर कंटेनर ठेवले, ते नागरिकांनी नदीत फेकले. यावरून तेथील रोष लक्षात येईल. सलग काही दिवस सुरु असलेल्या निदर्शनांच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान सरकार झुकले. त्याशिवाय पर्याय नव्हता. शेजारी अफगाणिस्तानशी शत्रुत्व आणि भारताबरोबर हाडवैर. भारतीय संघराज्याचा अविभाज्य असलेल्या जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाची समस्या समाप्त झालेली नसली तरी या राज्यात विकास कामांना गती मिळाली आहे. काश्मीर खोर्यात रेल्वे पोहोचली. केंद्र आणि राज्य सरकारमध्ये अनेक बाबतीत मतैक्य नसले तरी राज्याची वाटचाल प्रगतीच्याच दिशेने सुरु आहे. व्याप्त काश्मीरचे रहिवासी आपली तुलना या भागाशी करणे स्वाभाविक. या तुलनेत पाकिस्तानची आश्वासने किती फोल आहेत आणि आपला विकास खुंटला आहे, ही वस्तुस्थिती त्यांच्या लक्षात येते. यातूनच त्यांच्यामध्ये अस्वस्थता वाढत गेली. तेथील निदर्शने आणि आंदोलने आताची नाहीत.

गृहीत धरु नका...

आताच्या आंदोलनाचे चटके पाकिस्तानच्या आणि व्याप्त काश्मीरमधील कथित सरकारला बसले हे महत्त्वाचे. तो एक प्रकारे या दोघांसाठीही इश-ारा आहे. 'आम्हाला गृहीत धरता येणार नाही', हाच संदेश नागरिकांनी निदर्शनांद्वारे दिला आहे. मुजफ्फराबाद आणि पूँछ विभागासाठी आणखी दोन शैक्षणिक मंडळांची स्थापना, रुग्णांना विनामूल्य उपचारांसाठी 'हेल्थ कार्ड', मालमत्ता हस्तांतराचे दर पंजाब आणि खैबर पख्तुनख्वा येथील दरांएवढे करणे, या आणि अन्य मागण्या पाकिस्तानने मान्य केल्या आहेत. व्याप्त काश्मीरमधील धरणातील पाण्यामुळे पाकिस्तानसाठी मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती होते; मात्र स्थानिक नागरिकांना महागड्या दराने ती दिली जाते. आपल्या ताब्यातील प्रांत आणि नागरिक यांच्या शोषणाचे सर्वाधिकार आपल्याकडे आहेत, ही पंजाबी घटकांचे कायम प्राबल्य असलेल्या पाकिस्तान सरकारची, लष्कराची मानसिकता. याला व्याप्त काश्मीर अपवाद कसा असेल? बलुचिस्तानात काही घडले तर त्यामागे भारतीय गुप्तचर यंत्रणा असल्याचा कांगावा पाकिस्तानकडून केला जातो; पण तेच व्याप्त काश्मीरबद्दल बोलणे पाकिस्तानसाठी अडचणीचे आहे. पाकिस्तानने बळकावलेला भूभाग भारताचा आहे आणि तो त्याने परत द्यावा, ही भूमिका भार-ताने स्पष्टपणे मांडली. जम्मू- काश्मीर विधानसभेत व्याप्त काश्मीरसाठी काही जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. व्याप्त काश्मीर पाकिस्तानकडून सहजासहजी परत दिला जाण्याची अजिबात शक्यता नाही. लष्करी कारवाई, हाच मार्ग असला तरी गुंतागुंतीच्या भूराजकीय समीकरणांमध्ये तो भारताला वापरता येईल, असे ठामपणे म्हणता येत नाही. दुसरा भाग म्हणजे, भारताविरूद्ध शस्त्र म्हणून काश्मीर समस्येचे तुणतुणे वाजवणे इतर देशांकडून आर्थिक आणि लष्करी पाठबळ मिळविण्यासाठी पाकिस्तानला सोयीचे ठरते. 'दडपशाही दृष्टीकोनाचा आणि पद्धतशीर लूटमारीचा परिणाम' या बोचर्या शब्दांत भारताने आंदोलनाचे वर्णन करून पाकिस्तानला सुनावले. बलुचिस्ताननंतर आता व्याप्त काश्मीरचे नागरिकही पाकिस्तानला विटले आहेत.

## काश्मीरमध्ये असंख्य समस्या

**भारताचे लष्करप्रमुख, हवाई दल प्रमुख यांच्यासह संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नुकताच पाकिस्तानला सज्जड इशारा दिला. या पार्श्वभूमीवर व्याप्त काश्मीर हातचा जाऊ नये यासाठी तेथील सरकारने आंदोलकांच्या मागण्या मान्य केलेल्या दिसतात.**

**पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये कमालीची अस्वस्थता आहे. जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी कृती समिती आणि तेथील सरकार यांच्यात करार झाला खरा; मात्र तो कायमस्वरूपी शांततेचा मार्ग नाही. महागाई, महागड्या दराने पुरवली जाणारी वीज, बेरोजग-ारी, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना लाथाडणे यांसह व्याप्त काश्मीरमध्ये असंख्य समस्या आहेत. पाकिस्तानकडून व्याप्त काश्मीरचा उल्लेख ङ्गआझाद काश्मीरफअसा होतो; पण प्रत्यक्षात पाकिस्तानी शासकांचे वर्तन बलुचिस्तान आणि खैबर पख्तुनख्वा येथे दिसणार्या मनमानीप्रमाणेच असते. काही दिवसांपूर्वी व्याप्त काश्मीरमध्ये झालेली निदर्शने व्यापक आणि तीव्र होती.**

## डॉक्टर टीप्स

**मुलांना चांदीच्या भांड्यात जेवू घाला, फायदे जाणून व्हाल हैराण....**



### हेल्थ टिप्स

ह्यात समाविष्ट अँटी मायक्रोब्रियल शरीरास रोगांपासून रक्षण करते. यामुळे शरीरात कुठलेही संक्रमण होत नाही.

२ शरीरास थंड ठेवते:

चांदी थंड धातू असल्याने बाळाच्या आरोग्यास चांगली असते. शरीरातील उष्णतेला कमी करते. त्यामुळे बाळ शांत राहतं, उग्र किंवा तामसी होत नाही.उन्हाळ्यात चांदीचा ताटात जेवू घालावे,आणि चांदीचा ग्लासा मधून पाणी किंवा दूध पाजावे.३ शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती वाढीस होते : लहान मुलं नाजूक असतात त्यामुळे त्यांची शरीरातील रोग प्रतिरोधक शक्ती कमकुवत असते. ते लवकर आजारी पडतात. चांदीचा वापर केल्याने या धातूचे काही अंश (**क्रमशः**)

## विनोद




**शिक्षक :** **आकाशातील वीज आणि घरगुती वीज यात फरक काय?**
**विद्यार्थी :** **आकाशातल्या विजेचे बील येत नाहीत.**

## संदेश

Doctor: roz hotel mein khaane se hee aapko ulcer hui hai?
Patient: to aaj se mein ghar ko parcel leke jaaunga

## सुविचार

**उदात्त वृत्तीचा मनुष्यच उदात्त व्यक्तींना आकर्षून घेतो.**

**- गटे**




संस्कृत सुभाषित

**अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिश्च य:**
**द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति।।**
**(शांतीपर्व, अध्याय १३७, ोक १ महाभारत)**

**अर्थ :** येणाऱ्या संकटाची आधी तरतूद करून ठेवणारा व प्रसंग पडताच ज्याला युक्ती सुचते तो अशा दोन प्रकारच्या माणसांनाच सुखप्राप्ती होते. दीर्घसूत्री सर्वथा नाश पावतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे

कोड क्र. ९८



## आडवे शब्द

१. दिवाळीपासून सुरु
७. पाढे, श्लोक इ. पाठांतर
११. गीते
१२. लागू आडनावाच्या नटीचे नाव
१४. सुंदर
१५. तरंगणारा थर
१६. खानदान
१७. दुष्ट, नीच
२०. मऊ
२२. बैठे लाकडी आसन
२३. सदन
२४. प्रगतीशील
२५. वस्त्र विणण्याचे यंत्र
२६. सुंदर, मस्त
२७. आचारी
२९. तेज
३०. पाणी
३१. कडुलिंब (हिंदी)
३३. मोठी सुई
३४. थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
३७. आठवण
३८. बैलाच्या गळ्यात बांधायची दोरी
४०. साठ वर्षांचे झाल्यावर बुद्धी चळते या अर्थाचा वाक्प्रचार
४२. साधना
४४. माझे
४५. कबुतर
४६. बंगाल
४८. दात
५०. थंडगार
५१. पराभव
५३. लहान वयात काम करणारा
५४. शिक्षणासाठी मुलांची राहण्याची केलेली व्यवस्था
५६. अंतराळवाहन
५७. आचार्य अत्रे यांचे दैनिक
५८. महाभारतातील पाच भाऊ
६०. टप्पा
६१. भारत
६२. माळ
६३. कवितेतील परिच्छेद
६४. अधिकमास
६६. बागवान
६७. बाणांचा वर्षाव
७०. लेखणी
७३. चुलता
७५. पंजाबातील एक नदी
७८. संतोष, तृप्ती
७९. कुमक
८०. फुटक्या नशीबाचा
८१. जिवाची अस्वस्थता

## उभे शब्द

२. मरूभूमी, नदीकाठचा परिसर
३. स्वस्थ, गप्प
४. अंघोळीची जागा
५. उपवासाचे धान्य
६. माल, वस्तू
८. लक्ष्मी
९. चेहरा
१०. नोकरदार
१३. ओठ
१५. निरीक्षक
१८. कृष्णसखी
१९. दहावी रास
२१. घट्ट विळखा
२३. गर्द
२७. खाणीतील मजूर
२८. नवऱ्याचे वडील
३२. मृत
३५. विश्रांती
३६. मतिमान
३९. युद्ध
४१. सापाचा भाऊ
४३. दुसऱ्याच्या जागी स्वत:ला कल्पिणे
४५. कबुतर
४६. पाण्याची सार्वजनिक जागा
४७. हाल, कष्ट
४९. दाबून टाकणे
५१. महिना
५२. सापकिरडू इ.
५५. आयुष्यातील संसार करण्याचा काळ
५७. स्निग्ध औषध
५९. फांदी
६०. मोठे पाप
६१. हिंसा करणारा
६३. कसबी, कुशल
६५. वेल
६६. एका पाठी एक
६८. अर्क
६९. मऊ, रेशमी
७१. शेजारी, जवळ
७२. चिंतन
७४. ध्येय
७६. लोक
७७. एक गड्डा पानभाजी
७८. सारखे

## आडवे उत्तर

१.हिवाळा उन्हाळा पावसाळा ७.परवचा ११.गाणी १२.रीमा १४.मादक १५.तवंग १६.घराणे १७.नराधम २०.नरम २२.पाट २३.घर २४.सुधारक २५.माग २६.छान २७.खानसामा २९.रया ३०.नीर ३१.नीम ३३.दाभण ३४.सनविवि ३७.सय ३८.कासरा ४०.साठी बुद्धी नाठी ४२.तप ४४.मम ४५.पारवा ४६.वंग ४८.रद ५०.गारढोण ५१.मात ५३.बालकामगार ५४.वसतिगृह ५६.यान ५७.मराठा ५८.पांडव ६०.मजल ६१.हिंदुस्थान ६२.हार ६३.कडवे ६४.मलमास ६६.माळी ६७.शरपात ७०.कलम ७३.काका ७५.सतलज ७८.समाधान ७९.रसद ८०.कमनशिबी ८१.तगमग

## उभे उत्तर

२.वाळवंट ३.उगा ४.न्हाणीघर ५.वरी ६.सामानसुमान ८.रमा ९.वद १०.चाकरमानी १३.अधर १५.तपासनीस १८.राधा १९.मकर २१.मगरमिठी २३.घनदाट २७.खाणकामगार २८.सासरा ३२.मयत ३५.विसावा ३६.बुद्धिवंत ३९.समर ४१.नाग ४३.परकायाप्रवेश ४५.पाणवठा ४७.आबाळ ४९.दमन ५१.माह ५२.जनावर ५५.गृहस्थाश्रम ५७.मलम ५९.डहाळी ६०.महापातक ६१.हिंसक ६३.कलाकार ६५.लता ६६.मागोमाग ६८.रस ६९.तलम ७१.लगत ७२.मनन ७४.ध्येय ७६.जन ७७.कोबी ७८.सम



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### भारताविरुद्ध घातक गोलंदाजांची एन्ट्री

मुंबई-भारतीय क्रिकेट संघ ३ एकदिवसीय आणि ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली बऱ्याच काळानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळताना दिसतील. काही दिवसांआधी बीसीसीआयने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी संघ जाहीर केला होता. आता क्रिकेट ऑस्ट्रेलियानेही आपला संघ जाहीर केला आहे. मिचेल मार्शला दोन्ही फॉरमॅटमध्ये कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी टी-२० फॉरमॅटमधून निवृत्त झालेला वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कही ऑस्ट्रेलियाच्या एकदिवसीय संघात पुन्हा परतला आहे.

मिचेल स्टार्कच्या पुनरागमनामुळे ऑस्ट्रेलियाची गोलंदाजी अजून आक्रमक झाली आहे. मिचेल मार्शला एकदिवसीय आणि टी-२० साठी कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. आरोन हार्डी, मॅथ्यू कुहनेमन आणि मार्नस लाबुशेन यांना एकदिवसीय संघातून वगळण्यात आले आहे. एकदिवसीय सामन्यांसोबतच, ऑस्ट्रेलियाने भारताविरुद्धच्या पहिल्या दोन टी-२० सामन्यांसाठी १४ जणांचा संघ जाहीर केला आहे. या संघात नॅथन एलिस आणि जोश इंगलिस यांचाही समावेश करण्यात आला आहे.

एकदिवसीय मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचा संघ:

मिचेल मार्श (कर्णधार), झेवियर बार्टलेट, ॲलेक्स केरी, कूपर कॉनोली, बेन द्वारशुइस, नॅथन एलिस, कॅमेरॉन ग्रीन, जोश हेझल-वुड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंगलिस, मिचेल ओवेन, मॅथ्यू रेनशॉ, मॅट शॉर्ट, मिचेल स्टार्क, ॲडम झांपा.एकदिवसीय मालिकेचं वेळा-पत्रक- पहिला एकदिवसीय सामना: १९ ऑक्टोबर (पर्थ), दुसरा एकदिवसीय सामना: २३ ऑक्टोबर (ॲडिलेड) तिसरा एकदिवसीय सामना: २५ ऑक्टोबर (सिडनी)

****

### विराटची ऑस्ट्रेलियाला जायच्या आधी टीम मॅनेजमेंटसोबत सिक्रेट मीटिंग

मुंबई-ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी विराट कोहलीचे टीम इंडियामध्ये कमबॅक झाले आहे. टी-२० आणि टेस्ट क्रिकेटमधून निवृत्त झालेला विराट कोहली ऑस्ट्रेलियामध्ये ३ वनडे मॅचची सीरिज खेळणार आहे. तब्बल ७ महिन्यांनंतर म्हणजेच चॅम्पियन्स ट्रॉफीची फायनल जिंकल्यानंतर भारतीय चाहत्यांना विराट पहिल्यांदाच टीम इंडियाच्या जर्सीमध्ये दिसणार आहे, पण ऑस्ट्रेलियाला जाण्याआधी विराटने एक सिक्रेट मीटिंग घेतली आहे, ज्यात त्याने ३ खेळाडूंना टीमबाहेर करायला सांगितले आहे.

आयपीएल २०२५ मध्ये विराट कोहलीच्या आरसीबीने पहिल्यांदाच ट्रॉफी जिंकली, पण या विजयाचा आनंद आरसीबीला फार तास घेता आला नाही. आरसीबीच्या विजयाच्या जल्लोषावेळी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर चेंगराचेंगरी झाली, ज्यात ११ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जणांना दुखापत झाली. या घटनेनंतर आरसीबीचे मालक टीम विकणार असल्याच्याची चर्चा सुरू झाल्या आहेत.आयपीएल २०२६ च्या मोसमासाठी येत्या काही महिन्यांमध्ये खेळाडूंचा लिलाव होणार आहे, त्याआधी प्रत्येक टीमला काही खेळाडूंना सोडावं लागणार आहे. यासाठी टीम मॅनेजमेंटने विराट कोहली आणि कर्णधार रजत पाटीदार यांच्यासोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठक केली, या बैठकीत दोघांनीही तीन खेळाडूंना रिलीज करायला सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.इंग्लंडच्या या ऑलराऊंडरकडून आरसीबीला आयपीएल २०२५ च्या मोसमात बऱ्याच अपेक्षा होत्य

***

### भारताला करावा लागणार मिचेल स्टार्कचा सामना; ऑस्ट्रेलियाने जाहीर केला संघ

दिल्ली-भारताविरुद्धच्या वनडे आणि टी२० मालिकेसाठी



ऑस्ट्रेलियाने संघाची घोषणा केली असून, अनुभवी वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कचं संघात पुनरागन झालं आहे. जवळपास वर्षभरानंतर स्टार्क वनडे खेळणार आहे. मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज मार्नस लबूशेनला संघातून वगळण्यात आले आहे. लबूशेनचा क्वीन्सलँड संघातील सहकारी मॅट रेनशॉला वनडे संघात समाविष्ट करण्यात आले आहे. रेनशॉने याआधी फक्त कसोटीत ऑस्ट्रेलियाचं प्रतिनिधित्व केले आहे.लबूशेन गेल्या १० वनडे डावात धावांसाठी संघर्ष करत होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत मॅट शॉर्ट दुखापतग्रस्त झाल्याने लबूशेनला संधी मिळाली मात्र त्याला या संधीचा फायदा उठवता आला नाही. वनडे संघातून डच्चू देण्यात आल्याने लबूशेन ॲशेस मालिकेसाठी शेफील्ड शिल्डचे सामने खेळून तयारी करू शकतो.रेनशॉने ऑस्ट्रेलिया ए संघासाठी खेळताना सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. सध्या तो मधल्या फळीत खेळत आहे मात्र ॲशेस मालिकेसाठी त्याचा सलामीवीर म्हणून विचार होऊ शकतो. कसोटी पदार्पणानंतर जवळपास दशकभरानंतर रेनशॉला वनडे पदार्पणाची संधी आहे. २०२२ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी त्याला संघात सामील करण्यात आलं होतं मात्र अंतिम अकरात संधी मिळाली नव्हती.पोटऱ्यांना झालेल्या दुखापतीतून सावरलेल्या जोश इंगलिसचं

# गंभीर यांच्यामुळे संघात विजयाची मानसिकता







**नवी दिल्ली:**भारताचा फिरकीपटू वरुण चक्रवर्ती याने प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना त्यांनी संघामध्ये अशा प्रकारची मानसिकता निर्माण केली की ज्यामध्ये पराभव हा पर्याय म्हणूनही उरत नसल्याचे सांगितले. 'सीएट' क्रिकेट मानांकन पुरस्कार सोहळ्यादरम्यान वरुण चक्रवर्तीने माध्यमांशी संवाद साधताना प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या दृष्टिकोनाबद्दल स्पष्ट भाष्य केले. ''आयपीएल'मधून मला गंभीर यांच्या कार्यपद्धतीचा अनुभव होता. त्यामुळे मला त्यांची मार्गदर्शन शैली नवी नाही. त्यांनी संघामध्ये एक प्रकारची दृढनिश्चयी मानसिकता निर्माण केली आहे. ज्यामुळे संघासमोर पराभवाचा पर्यायच उरत नाही. तुम्हाला फक्त सर्वोत्तम खेळ दाखव-ावा लागतो आणि सर्वस्व पणाला लावावे लागते,'' असे चक्रवर्ती म्हणाला.

प्रसारमाध्यमांनी मला गूढ फिरकी गोलंदाज अशी उपमा दिली आहे ती आपल्याला मान्य नाही, असेही वरुण म्हणाला. ''मी कधीही स्वत:ला गूढ गोलंदाज म्हटलेले नाही. माध्यमांनी मला ही उपमा दिली आहे. माझ्याकडे प्रत्येक चेंडू एकाच ग्रीपने आणि एकाच पद्धतीने सोडण्याची क्षमता आहे. यानंतरही मला गूढ म्हणायचे असेल, तर ते ठीक आहे,'' असे वरुणने सांगितले.

आशिया चषक स्पर्धेतील विजेतेपद-ावर भाष्य करताना वरुणने संघ केवळ अपराजित राहण्यावर लक्ष केंद्रित करत होता. मैदानाबाहेर काय सुरू आहे त्याकडे दुर्लक्ष करण्यावर भर राहिल्याचे स्पष्ट केले. ''इतरांबद्दल माहीत नाही. पण, आम्ही जेव्हा आशिया चषक स्पर्धेसाठी पोहोचलो, तेव्हा आमचे प्राथमिक ध्येय विजेतेपदा-चेच होते. अन्य गोष्टींकडे आम्ही बघतही नव्हतो. विजेतेपद, प्रत्येक लढत जिंकणे आणि ट्वेन्टी-२० विश्वचषकासाठी भक्कम तयारी करणे हेच आमचे उद्दिष्ट होते,'' असे चक्रवर्ती म्हणाला.

आशिया चषक स्पर्धेदरम्यान भारतीय खेळाडू समाजमाध्यमांवर चांगलेच सक्रिय असल्याचे दिसून आले. मात्र, वरुणने हे मान्य करण्यास नकार दिला. संघातील प्रत्येक खेळाडू समाजमाध्यमापासून दूर होता. केवळ सामन्यानंतर ते त्याचा उपयोग करत होते. आम्ही परदेशात होतो. त्यामुळे भारतात काय सुरू होते हे आम्हाला समजत नव्हते. संयुक्त अरब अमिरातीत मात्र सर्व शांत होते, असे वरुणने सांगितले.

कुलदीप यादवच्या गोलंदाजीचे कौतुक करताना वरुण म्हणाला, ''त्याच्यासोबत गोलंदाजी करणे हा एक सुंदर अनुभव आहे. आम्ही एकमेकांना पूरक आहोत. कारण मी ताशी ९५ कि.मी., तर कुलदीप ८५ कि.मी. वेगाने गोलंदाजी करतो. त्याच्याकडे अधिक फिरकी आहे, तर माझ्याकडे अधिक वेग आणि उसळी आहे. यामुळेच आम्ही एकत्र कामगिरी करताना यशस्वी झालो.''

चक्रवर्ती आणखी काय म्हणाला

प्रशिक्षक गंभीर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी माझ्यात आत्मविश्वास निर्माण केला.

माझी भूमिका गडी बाद करणे आणि यष्ट्यांवर गोलंदाजी करणे. यासाठी दोघांनी मला स्वातंत्र्य दिले.

एकदिवसीय सामने खेळण्यासाठी फलंदाजीत सुधारणा करण्याची आवश्यकता.

## फक्त १० धावा करताच रोहित शर्मा रचणार इतिहास

पर्थ/मेलबर्न: शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ १९



ऑक्टोबरपासून ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तीन एकदिवसीय (जऊख) सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेतून रोहित शर्मा सात महिन्यांच्या ब्रेकनंतर एकदिवसीय संघात पुनरागमन करत आहे. कर्णधारपदावरून पायउतार झाल्यानंतरही रोहित शर्मासाठी हा दौरा अत्यंत महत्त्वाचा असणार आहे, कारण त्याला पहिल्याच सामन्यात एक मोठा विक्रम आपल्या नावावर करण्याची सुवर्णसंधी आहे.

काय आहे तो विक्रम?

सध्या रोहित शर्माने ऑस्ट्रेलियात ऑस्ट्रेलियाविरुद्ध सुमारे ९९० आंतरराष्ट्रीय धावा केल्या आहेत. फक्त १० धावा जोडल्यास त्याच्या १००० धावा पूर्ण होतील, ज्यामुळे तो ऑस्ट्रेलियात ऑस्ट्रेलियाविरुद्ध १००० आंतरराष्ट्रीय धावा करणारा पहिला भारतीय फलंदाज ठरेल.

'हिटमॅन'ची कामगिरी आणि आगामी रेकॉर्ड

रोहित शर्मा हा ऑस्ट्रेलियाविरुद्ध नेहमीच उत्कृष्ट फॉर्ममध्ये असतो. त्याला ऑस्ट्रेलियन खेळपट्ट्यांवर फटकेबाजी करायला आवडते. आगामी ३ एकदिवसीय आणि ५ टी२० सामन्यांच्या या दौऱ्यात 'हिटमॅन'चे लक्ष्य केवळ १० धावा पूर्ण करून हा टप्पा गाठण्याचे नसून, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी करण्याकडे असेल.

भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा २०२५

पहिली लाईव्ह - रविवार १९ ऑक्टोबर - पर्थमधून सकाळी ९ पासून लाईव्ह

दुसरी टी-२०- - गुरुवार २३ ऑक्टोबर - ॲडलेडमधून सकाळी ९ पासून लाईव्ह

तिसरी टी-२०- - शनिवार २५ ऑक्टोबर - सिडनीतून सकाळी ९ पासून लाईव्ह

पहिली टी-२०- - बुधवार २९ ऑक्टोबर - कॅनबेरातून दुपारी १.४५ पासून लाईव्ह

दुसरी टी-२०- शुक्रवार ३१ ऑक्टोबर - मेलबर्नमधून दुपारी १.४५ पासून लाईव्ह

तिसरी ढ२०ख - रविवार २ नोव्हेंबर - होबार्टमधून दुपारी १.४५ पासून ङखतए

चौथी ढ२०ख - गुरुवार ६ नोव्हेंबर - गोल्ड कोस्टमधून दुपारी १.४५ पासून ङखतए

पाचवी ढ२०ख - शनिवार ८ नोव्हेंबर - ब्रिस्बेनमधून दुपारी १.४५

## ऑस्ट्रेलियाला धडकी भरवली, घरच्या मैदानावर भारताने उडवली दाणादाण



दिल्ली,७ ऑक्टोबर-भारतीय अंडर-१९ संघ आणि ऑस्ट्रेलियन अंडर-१९ संघ यांच्यातील दुसरा युवा कसोटी सामना ७ ऑक्टोबर रोजी मॅके येथे सुरू झाला. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय यजमानांना महागात पडला कारण भारतीय गोलंदाजांनी अर्धा संघ अवघ्या ३२ धावांतच बाद केला. त्यानंतर संपूर्ण ऑस्ट्रेलियन संघ १३५ धावांवर ऑलआउट झाला. प्रत्युत्तरात, भारतीय संघाने दिवसाचा खेळ संपेपर्यंत ७ विकेटच्या मोबदल्यात १४४ धावा केल्या आहेत. टीम इंडियाने ९ धावांची आघाडी घेतली आहे.


सामन्यात आत्तापर्यंत काय घडले?ऑस्ट्रेलियाने नाणेफ`क जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय संघासाठी योग्य ठरला नाही आणि संघ पहिल्या डावात १३५ धावांवर बाद झाला. कांगारू संघाकडून विकेटकीपर-फलंदाज ॲलेक्स ली यंगने सर्वाधिक धावा केल्या. त्याने १०८ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. यश देशमुखने २२ धावा आणि विल मलाझुकने १० धावांचे योगदान दिले. संघातील उर्वरित ८ फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत. भारताकडून खिलन पटेल आणि हेनिल पटेल यांनी प्रत्येकी ३ विकेट घेतल्या, तर उद्धव मोहनने २ आणि दीपेश द्रवेंद्रनने १ विकेट घेतली.

कर्णधार आयुष म्हात्रे ८ धावांवर बाद झाला. भारताची सुरुवातही फारशी चांगली नव्हती. संघाने १७ धावांवर पहिली विकेट गमावली. सलामीवीर विहान मल्होत्रा ११ धावांवर बाद झाला. दुसरी विकेट १८ धावांवर पडली. आता कर्णधार आयुष म्हात्रे ८ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला. त्यानंतर वैभव सूर्यवंशी २० धावांवर, राहुल कुमार ९ धावांवर, वेदांत त्रिवेदी २५ धावांवर, हरवंश पंगालिया १ धावांवर आणि खिलन पटेल २६ धावांवर बाद झाले. हेनिल पटेल (२२) आणि दीपेश द्रवेंद्रन (६) नाबाद परतले. ऑस्ट्रेलियाकडून केसी बार्टनने आतापर्यंत ३ बळी घेतले. विल बायरमने २ बळी घेतले. चार्ल्स लॅचमंड आणि ज्युलियन ऑसबोर्न यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असलेल्या वैभव सुर्यवंशीला मिळाली वॉर्निंग

मुंबई-टीम इंडियाचा युवा स्टार खेळाडू वैभव सुर्यवंशी सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे.या दौऱ्यात वैभव सुर्यवंशी त्याच्या बॅटीने चांगली कामगिरी करतो आहे. अशात वैभव सुर्यवंशीला एक वॉर्निंग आली आहे. या वॉर्निंगनूसार त्याची फिटनेसची चौकशी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेमकं हे काय प्रकरण आहे? हे जाणून घेऊयात.

टीम इंडियाचा अंडर १९ संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. या दौऱ्यातला शेवटचा टेस्ट सामना सध्या टीम इंडिया खेळते आहे. या सामन्या दरम्यानच वैभव सुर्यवंशीला मोठी वॉर्निंग मिळाली आहे.त्यामुळे आता भारतात आल्यावर त्याच्या फिटनेसची चौकशी होणार आहे. टीम इंडियाच्या माजी प्रशिक्षकाने केलेल्या विधानानंतर वैभव सुर्यवंशीची चौकशी होण-ार आहे.टीम इंडियाचे माजी फलंदाजी प्रशिक्षक विक्रम राठोड यांनी वैभव सुर्यवंशीला त्याच्या फिटनेसवरून त्याला इश-ारा दिला आहे. तसेच भारतात आल्यावर त्याची चौकशी केली जाणार असल्याचेही राठोड यांनी



सांगितले आहे.

आयपीएलमधल्या राजस्थान रॉयल्स या फ्रेंचायजी टीमने एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये विक्रम राठोड आणि वैभव सूर्यवंशी यांच्यातील व्हिडिओ कॉल संभाषण दाखवण्यात आले आहे. या कॉलमध्ये, राठोड सुरुवातीला हसतात आणि वैभवला ऑस्ट्रेलियातील त्याच्या अनुभवाबद्दल विचार-तात. त्यानंतर अचानक विषय फिटनेसकडे वळवतो.

यावेळी राठोड कॉलवर वैभवला विचारतात, ''तुझी फिटनेस कशी आहे?'' वैभव यावर उत्तर देतो, ''फिटनेस ठीक आहे.''परंतु प्रशिक्षक त्याच्या उत्तराशी सहमत नसल्याचे दिसून येते आणि पुढे ते म्हणतात, तू परत आल्यावर समजेल. याचाच अर्थ वैभव सुर्यवंशीने आपल्या फिटनेसवर विशेष लक्ष द्यावे, अशी राठोडची इच्छा आहे. त्यामुळे वैभव भार-तात परतल्यास त्याची फिटनेस चाचणी घेतील,अशी चर्चा आहे. मिडिया रिपोर्टनुसार, वैभवला औपचारिकपणे इशारा देण्यात आला आहे. संघ व्यवस्थापनाने त्याला स्पष्ट केले आहे की फिटनेस मानकांशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. भारतात परतल्यानंतर त्याची फिटनेस टेस्ट केली जाईल. हे पाऊल महत्त्वाचे आहे कारण वैभवला राजस्थान रॉयल्ससाठी भविष्यातील संभाव्य खेळाडू म्हणून पाहिले जाते आणि संघ त्याला पुढील स्तरावर विकसित करू इच्छितो.ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पहिल्या मल्टी-डे सामन्यात वैभव सूर्यवंशीने ११३ धावांची शानदार खेळी खेळ-ली. ही त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वोत्तम काम गिरी होती. प्रशिक्षक आणि निवडकर्त्यांनी त्याच्या काम गिरीचे कौतुक केले आहे,

# पृथ्वी शॉला राग अनावर, भर मैदानात मित्राच्या अंगावर धावून गेला

दिल्ली-रणजी चषक २०२५-२६ सुरू होण्याआधी मुंबई व महाराष्ट्राच्या संघात पुण्यामध्ये आजपासून (मंगळवार, ७ ऑक्टोबर) सराव साम न्याला सुरुवात झाली आहे. या सराव सामन्याच्या पहिल्याच दिवशी मैदानात मोठा गोंधळ पाहायला मिळाला. या सामन्यात महाराष्ट्राकडून खेळणारा पृथ्वी शॉ रागाच्या भरात त्याच्या जुन्या सहकाऱ्यावर धावून गेला. पृथ्वी शॉ बॅट घेऊन मुशीर खानच्या मागे धावत गेला. पृथ्वी शॉने स्वत:वरील नियंत्रण गमावल्याचं पाहायला मिळालं. या घटनेचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.



मुंबई विरुद्ध महाराष्ट्र सामन्यात तुफान राडा

आठ वर्षे मुंबईकडून देशांतर्गत क्रिकेट खेळणारा पृथ्वी शॉ सध्या महाराष्ट्राच्या संघाकडून खेळत आहे. आज मुंबईविरोधात खेळवण्यात आलेल्या सराव सामन्याच्या पहिल्या दिवशी त्याने २१९ चेंडूत १८१ धावांची धडाकेबाज खेळी साकारली. रणजी चषक २०२५-२६ च्या आधी खेळवण्यात आलेल्या या सराव सामन्यावेळी शॉने त्याची ताकद दाखवून दिली. त्याने मैदानाच्या प्रत्येक कोपऱ्यात फटके लगावले.

पृथ्वी शॉने १४० चेंडूत शतक झळकावलं. १८१ धावांवर खेळत असताना त्याने एक मोठा फटका लगावला. मात्र, सीमारेषेजवळ उभ्या मुशीर खान याने झेल टिपला आणि पृथ्वी शॉची वादळी खेळी संपुष्टात आणली. त्यानंतर पृथ्वी व मुशीरमध्ये मैनादातच राडा झाल्याचं पाहायला मिळालं.

मैदानावर नेमकं काय घडलं?

बाद झाल्यानंतर पृथ्वी शॉ पव्हेलियनच्या दिशेने चालू लागला होता. त्याचवेळी त्याच्यात व मुशीर खानमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर पृथ्वी शॉ बॅट घेऊन मुशीर खानच्या दिशेने धावला. त्याने बॅट उगारली मात्र मुशीर व त्याच्यामध्ये बरंच अंतर होतं त्यामुळे बॅट मुशीरला लागली नाही. तेवढ्यात पंच देखील तिथे आले आणि त्यांनी स्थिती नियंत्रणात आणली. पंच पृथ्वी शॉला बाजूला घेऊन गेले, तर मुंबईचे खेळाडू मुशीर खानला दुसऱ्या बाजूला घेऊन गेले आणि मैदानावरील हा वाद मिटला.

मुशीर खान हा भारतीय संघातील खे-ळाडू सर्फराज खान याचा धाकटा भाऊ आहे. त्याने याआधी १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचं प्रतिनिधीत्व केलं आहे.

पृथ्वी शॉ याच्या नेतृत्वाखाली भारताने २०१८ चा १९ वर्षाखालील क्रिकेट विश्वचषक उंचावला होता. त्याच वर्षी त्याने भारतीय कसोटी संघात पदार्पण केलं. पदार्पणाच्या सामन्यात शतक ठोकून त्याने त्याची ताकद दाखवून दिली होती. मात्र, नंतरच्या काळात त्याला त्याचा फॉर्म टिकवता आला नाही. परिणामी त्याने भारतीय संघातील स्थान गमावलं. त्यानंतर त्याने आयपीएल संघातील स्थान गमावलं. रणजी क्रिकेटमध्ये देखील त्याची धडपड चालू आहे. अलीकडेच त्याने बूची बाबू स्पर्धेत चांगली कामगिरी केली आहे. तसेच रणजी स्पर्धेआधी खेळवण्यात आलेल्या सराव सामन्यांमध्ये त्याची बॅट चांगलीच तळपल्याचे पाहायला मिळाले आहे. त्यामुळे यंदाच्या रणजी स्पर्धेत त्याच्या कामगिरीकडे क्रिकेटरसिकांचे लक्ष असेल.

## रणजीतून पुनरागमन करणार : ऋषभ पंत

नवी दिल्ली : बीसीसीआयने आधीच स्पष्ट केले आहे की, प्रत्येक खेळाडूला, वयाची पर्वा न करता, देशांतर्गत क्रिकेट खेळणे बंधनकारक आहे. अन्यथा, त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये संधी दिली जाणार नाही. या संदर्भात, दुखापतीमुळे सध्या भारतीय संघाबाहेर ऋषभ पंतला पुन्हा भारताकडून खेळण्यापूर्वी रणजी ट्रॉफीमध्येही खेळावे लागेल. २५ ऑक्टोबर रोजी दिल्ली संघाच्या रणजी ट्रॉफी सामन्याद्वारे पंत स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये परतू शकतो.

इंग्लंड दौर्यावर मँचेस्टर कसोटीदरम्यान ऋषभ पंतला दुखापत झाली होती. त्याचा पाय फ्रॅक्चर झाला होता,



ज्यामुळे तो आशिया कप, वेस्ट इंडिज कसोटी मालिका आणि आगामी ऑस्ट्रेलिया दौर्यात सहभागी होऊ शकणार नाही. बीसीसीआयची वैद्यकीय टीम येत्या आठवड्यात सेंटर ऑफ

## मंत्रिमंडळ निर्णय (संक्षिप्त)

**(उद्योग विभाग)**

महाराष्ट्र राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर. सोने, चांदीचे दागिने,हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार. एक लाख कोटीं रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितेच उद्दीष्ट.

**(नगर विकास विभाग)**

राज्यातील नागरी भागातील सांडपाण्यावर प्रक्रियेचे धोरण. सांडपाण्यावरील प्रक्रीयेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराव्दारे चक्रीय अर्थव्यवस्थेस (सर्क्युलर ईकॉनॉमी) ला चालना. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार. राज्यातील ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबविण्यात येणार

**(महसूल विभाग)**

तुकडे बंदी अधिनियमात सुधारणा करण्यास मान्यता. महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मध्ये सुधारणा करण्यात येणार. अधिनियमातील कलम ८ (ब) चे परंतुक वगळून कलम ९ मध्ये पोट-कलम (३) नंतर परंतुक समाविष्ट करण्यात येणार.

**(गृहनिर्माण विभाग)**

मुंबईत झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण (एसआरए) अंतर्गत झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी समूह पुनर्विकास योजना राबविणार.

**(महसूल विभाग)**

अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम. ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जींग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २ हेक्टर ३८ आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय.

**(इतर मागास बहुजन कल्याण विभाग)**

स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार.

**(वस्त्रोद्योग विभाग)**

खाजगी सूतगिरण्यांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत सहकारी सूतगिरण्यांप्रमाणे युनीट मागे ३ रुपये वीज अनुदान सवलत लागू करण्याचा निर्णय. राज्य औद्योगिक समुह विकास योजनेंतर्गत क्लस्टरमधील सुतगिरण्यांना दिलासा मिळणार.

**(वस्त्रोद्योग विभाग).**

यंत्रमागधारकांना वीज सवलतीचा लाभ घेण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागणार. शासन निर्णय जारी झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत नोंदणी करावी लागणार.

**(विधि व न्याय विभाग)**

अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय, या न्यायालयाकरिता आवश्यक पदांना मान्यता.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील ४ कर्मचाऱ्यांना महाव्यवस्थापकांचा संरक्षा पुरस्कार







**सोलापूर /प्रतिनिधी :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री विजय कुमार यांनी ०७.१०.२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमात सोलापूर विभागातील ४ मध्य रेल्वे कर्मचाऱ्यांना संरक्षा पुरस्काराने सन्मानित केले.

मागील महिन्यांत संबंधित कर्मचाऱ्यांनी कर्तव्यादरम्यान दाखवलेल्या सतर्कतेबद्दल, अनुचित घटना टाळण्यात आणि रेल्वे ऑपरेशनमध्ये सुरक्षितता सुनिश्चित करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल संरक्षा पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रत्येक पुरस्कारात पदक, प्रशंसा प्रमाणपत्र, अनुकरणीय सुरक्षा कार्याचे प्रशस्तिपत्र आणि ₹ २०००/- रोख बक्षीस असते.

पुरस्कार विजेत्यांचे तपशील

१. श्री प्रताप हीरू, पॉइंट्समन, वाडी, सोलापूर विभाग, ११.०९.२०२५ रोजी शंटिंग कामादरम्यान, त्यांना जवळच्या आरडी लाईनवर फ्रैक्चर असल्याचे लक्षात आले. त्यांनी तात्काळ संबंधित सर्वांना माहिती दिली. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

२. श्री शिवराज हनुमंत चिंचोरे, ट्रेन मॅनेजर, सोलापूर, सोलापूर विभाग, ०१.०९.२०२५ रोजी मालगाडीत काम करत असताना, शेजारच्या मार्गावरून जाणाऱ्या मालगाडीशी सिग्नल एक्सचेंज होत असताना, त्यांना ब्रेक व्हॅनमधून सहाव्या वॅगनच्या एक्सल बॉक्समधून धूर येत असल्याचे लक्षात आले. त्यांनी संबंधित सर्वांना माहिती दिली. तपासणी केल्यानंतर, एक गरम एक्सल आढळून आला. त्यांच्या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

३. श्री संजीत कुमार, ट्रॅक मेंटेनर, पारेवाडी, सोलापूर विभाग आणि ४. श्री भवर सिंह यादव, ट्रॅक मेंटेनर, पारेवाडी, सोलापूर विभाग २८.०७.२०२५ रोजी रात्रीच्या गस्तीदरम्यान, दोघांनाही भोपाळपेठ पुलाजवळ एसईजेचा टंग रेल तुटल्याचे लक्षात आले. त्यांनी रेल्वे मार्गाचे रक्षण करताना संबंधित सर्वांना माहिती दिली. दरम्यान, ट्रेन क्रमांक २२१६० पारेवाडी स्टेशनवरून निघाली होती. त्यांच्या सतर्कतेमुळे आणि त्वरित कारवाईमुळे संभाव्य अपघात टळला.

महाव्यवस्थापकांनी आपल्या भाषणात पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या कर्तव्यांप्रती असलेल्या सतर्कतेबद्दल आणि समर्पणाबद्दल त्यांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की अशा सतर्कता आणि शौर्याच्या कृतींमुळे इतरांना प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रामाणिकपणे काम करण्यास आणि जीवितहानी, मालवाहतूक आणि रेल्वे मालमत्तेचे नुकसान टाळण्यास प्रेरित केले जाईल.

अतिरिक्त महाव्यवस्थापक श्री प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य संरक्षा अधिकारी श्री चंद्र किशोर प्रसाद, इतर प्रमुख विभाग प्रमुख आणि मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# आंबिया बहारमध्ये डाळिंब, आंबा पिकासाठी विमा योजना लागू

**लातूर/प्रतिनिधी :** सन २०२५-२६ या वर्षात आंबिया बहारमध्ये आंबा, डाळिंब, केळी, पपई व द्राक्ष या पिकांसाठी पुर्नरचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना लातूर जिल्ह्यातील अधिसूचित तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळामध्ये लागू करण्यात आली आहे. ही योजना कार्यान्वित करणारी विमा कंपनी शासनाच्या महावेध प्रकल्पांतर्गत स्थापन केलेल्या हवामान केंद्रात नोंदवल्या गेलेल्या हवामानाच्या तपशीलानुसार विमा योजनेत भाग घेतलेल्या शेतकऱ्यांना परस्पर नुकसान भरपाई देईल. लातूर जिल्ह्यात ही योजना बजाज अलीयान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लि पुणे या विमा कंपनी मार्फत कार्यान्वित केली जात आहे.

जिल्ह्यातील अधिसूचित फळपिके व महसूल मंडळ

लातूर, औसा, निलंगा, रेणापूर, शिरुर अनंतपाळ, उदगीर, अहमदपूर, चाकूर, जळकोट, देवणी या सर्व तालुक्यातील सर्व महसूल मंडळासाठी आंबा फळपिकासाठी ही योजना लागू असून यासाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर, २०२५ आहे. तर संरक्षित रक्कम १ लाख ७० हजार रुपये असून शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता ८ हजार ५०० रुपये इतका आहे.

डाळींब या पिकासाठी लातूर तालुक्यातील तांदूळजा, मुरुड, औसा तालुक्यातील औसा, लामजना, किनीथोट, किल्लारी, बेलकूंड, भादा, उजनी, निलंगा तालुक्यातील निलंगा, औराद शहाजनी, रेणापूर तालुक्यातील कारेपूर व पानगाव, उदगीर तालुक्यातील नागलगाव, हेर, अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर, किनगाव व खंडाळी, चाकूर तालुक्यातील चाकूर, नळेगाव, वडवळ ना. या महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू राहील. यासाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत १४ जानेवारी, २०२६ पर्यंत आहे. विमा संरक्षित रक्कम १ लाख ६० हजार रुपये असून शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता ८ हजार रुपये इतका आहे.

केळी पिकासाठी औसा तालुक्यातील किल्लारी व मातोळा, अहमदपूर तालुक्यातील अहमदपूर या महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू राहील. यासाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत आहे. विमा संरक्षित रक्कम १ लाख ७० हजार रुपये असून शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता ८ हजार ५०० रुपये इतका आहे. पपई पिकासाठी औसा तालुक्यातील उजनी, निलंगा तालुक्यातील निलंगा, उदगीर तालुक्यातील देवर्जन, अहमदपूर तालुक्यातील हाडोळती या महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू राहील. यासाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत आहे. विमा संरक्षित रक्कम ४० हजार रुपये असून शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता २ हजार रुपये इतका आहे.

द्राक्ष पिकासाठी औसा तालुक्यातील औसा, लामजना, किनीथोट, किल्लारी, बेलकूंड, भादा, निलंगा तालुक्यातील निलंगा, औराद शहाजनी, आंबुलगा, कासार बालकुंदा, उदगीर तालुक्यातील मोघा व देवर्जन, रेणापूर तालुक्यातील कारेपूर, चाकूर तालुक्यातील नळेगाव व शेळगाव या महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू राहील. यासाठी विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत आहे. विमा संरक्षित रक्कम ३ लाख ८० हजार रुपये असून शेतकऱ्यांनी भरावयाचा हप्ता १९ हजार रुपये इतका आहे.

कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ही योजना ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदार शेतकऱ्यांव्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेतकरी करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. तसेच सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) बंधनकारक राहील. अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी महावीर चिकटे (भ्रमणध्वनी क्र. ८४८२८१९०८२) यांच्याशी संपर्क साधून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शिवसांब लाडके यांनी केले.

## मतदार यादी, बीएलओ रजिस्टर छपाईसाठी दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमानुसार मतदार यादी, बीएलओ रजिस्टर छपाई व झेरॉक्स करण्यासाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या कामासाठी २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दरपत्रके सादर करता येतील. या कामाची निविदा २७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उघडण्यात येईल, असे लातूरचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

## लातूर येथे मुख्याध्यापक, प्राचार्यांसाठी ८ ऑक्टोबर रोजी 'जागर योजनांचा' कार्यशाळा

**लातूर /प्रतिनिधी :** शिक्षणाधिकारी (योजना) कार्यालय आणि लातूर जिल्हा खाजगी मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालये आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांसाठी एकदिवसीय 'जागर योजनांचा' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दयानंद सभागृह, लातूर येथे दुपारी १२ वाजता ही कार्यशाळा होईल.

कार्यशाळेचे उद्घाटन लातूरच्या जिल्हाधिकारी तथा उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम नियामक परिषदेच्या अध्यक्षा वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे लातूर विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग, लातूर विभागीय शिक्षण उपसंचालक तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) डॉ. दत्तात्रय मठपती, लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सर्व व्यवस्थापनाच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांमधील मुख्याध्यापक व प्राचार्यांना व्हावी आणि या योजना प्रत्येक शाळा व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, या उद्देशाने हे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेस जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे आणि लातूर जिल्हा खाजगी मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी केले.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या अमोनिया गॅस सेन्सर संशोधनाला आंतरराष्ट्रीय पेटंट

## डॉ.विश्वनाथ मोटे, डॉ.रवींद्र शिंदे, संध्या जाधव यांच्या संशोधनाला जर्मनीचे पेंटट






**लातूर /प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संशोधक प्राध्यापकांनी एकत्रित येऊन केलेल्या गॅस सेन्सर संशोधनास नुकतेच जर्मनीचे आंतरराष्ट्रीय पेटंट प्राप्त झालेले आहे. दयानंद विज्ञान महाविद्यालयातील थिन फिल्म व मटेरियल सायन्स रिसर्च प्रयोगशाळेच्या भौतिकशास्त्र विभागातील प्रा.डॉ.विश्वनाथ मोटे,संशोधक विद्यार्थीनी संध्या जाधव,रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.रवींद्र शिंदे तसेच सीएमआर टेक्नॉलॉजी हैदराबाद येथील प्रा.डॉ. जी.उमादेवी यांनी केलेल्या या नावीन्यपूर्ण संशोधनाला जर्मनी या देशाने आंतरराष्ट्रीय पेटंट म्हणून मान्यता दिली आहे.नॅनो पेटल एमएन डोपड् झेडएनओ पदार्थापासून तयार केलेले नवीनतम पदार्थाचे हे गॅस सेन्सर आहे. हे गॅस सेन्सर अगदी कमी तापमानात अमोनिया हा विषारी वायू शोधणे व त्याची तीव्रता मोजण्यासाठी याचा उपयोग होतो.तसेच पाकळ्यासारख्या नॅनो स्ट्रक्चर्ड एमएन डोपड् झेडएनओ फिल्म्स हे गॅस सेन्सर औद्योगिक वातावरणातील,कृषी क्षेत्रातील आणि सांडपाणी प्रक्रिया संचयनामध्ये मानवी आरोग्याचे रक्षण करण्यासाठी विश्वासार्ह प्रणाली विकसित केले आहे.भविष्यात नवीन संधीचे दारे या संशोधनामुळे खुली होतील अशी माहिती डॉ.विश्वनाथ मोटे व सहकारी संशोधकांनी दिली आहे.

डॉ.विश्वनाथ मोटे, संशोधक संध्या जाधव आणि डॉ.रवींद्र शिंदे यांनी हवेतील हानिकारक वायू,विशेषता अमोनिया शोधण्यासाठी एक अद्वितीय नॅनो स्ट्रक्चर्ड मटेरियल डिझाईन केले आहे.हा शोध अमोनियाच्या कमी सांद्रतेचा शोध घेण्यासाठी एमएन डोपड् झेडएनओ सेन्सर मटेरियलच्या विकासासाठी पर्यावरणपूरक,कमी खर्चाची आणि सोपी स्प्रे पायरोलिसिस तंत्र विकसित करण्याशी संबंधित आहे. पाकळ्यांसारख्या नॅनोस्ट्रक्चर्ड एमएन डोपड् झेडएनओ सेन्सर्सनी जलद पुनर्प्राप्ती,प्रतिसाद वेळेसह उत्कृष्ट अमोनिया कामगिरी प्रदर्शित केली. चांगली निवडकता आणि खोलीच्या तापमानावर १५ पीपीएमच्या अल्ट्रालो एकाग्रतेचा शोध घेतला आणि ८०% पर्यंत वायूला साधारण प्रतिसाद दिला. पाकळ्यांसारख्या नॅनो स्ट्रक्चर्सद्वारे हा शोध साध्य झाला आहे.ज्यामध्ये एमएन डोपड् झेडएनओ आधारित मटेरियल वापरले जाते.

डॉ.विश्वनाथ मोटे यांच्या मते,हे नॅनो स्ट्रक्चर्ड मटेरियल पर्यावरणपूरक आहेत आणि आरोग्याला कोणताही धोका देत नाहीत.खोली तापमान गॅस सेन्सर्सचा विकास,विशेषता मेटल ऑक्साईड आधारित सेन्सर्स हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे एक उदयोन्मुख क्षेत्र आहे.ज्याचा उद्देश अगदी कमी सांद्रतेतही वायू शोधणे आहे.एमएन डोपड् झेडएनओ आधारित मटेरियल विविध अनुप्रयोग जसे की,गॅस सेन्सर्स बायोमेडिसिन,स्टोरेज डिव्हाईसेस,सौर पेशी आणि ऑप्टिकल डिव्हायसेस इ.साठी उपयोग होतो.पाकळ्यांसारख्या फिल्म्सचे आकारविज्ञान आणि त्यांच्या धान्याचा आकार ज्याप्रकारे बदलला जातो,त्याचा झेडएनओ आधारित सेन्सरच्या गॅस सेंसिंग कामगिरीवर महत्त्वपूर्ण परिणाम झाला. पाकळ्यांसारख्या आकारविज्ञानामुळे गॅस सेन्सिंग गुणधर्म कसे बदलतात याचे विश्लेषण करून,डोपिंग एकाग्रता,धान्याचा आकार, संश्लेषण तंत्र पॅरामिटर्स इत्यादी,अशी माहिती दिली.

डॉ.रवींद्र शिंदे यानी असे म्हटले आहे की,अमोनिया हा एक विषारी रासायनिक वायू आहे,जो मानवी आरोग्यावर आणि पर्यावरणावर विशेषतः उच्च सांद्रतेवर लक्षणीय प्रतिकूल परिणाम करू शकतो. त्यांच्या संपर्कात राहिल्याने शोषणास त्रास,गरगर आणि श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो आणि दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने श्वसनास जळजळ आणि नुकसान होऊ शकते.उच्च पातळीमुळे डोळ्यांची जळजळ त्वचेवर जळजळ,न्यूरोलॉजिकल लक्षणे डोकेदुखी,चक्कर येणे व गोंधळ आणि हृदय गती वाढणे व रक्तदाब यासारख्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या देखील उद्भवू शकतात.

अमोनियाच्या कमी पातळीच्या सतत संपर्कात राहिल्याने दीर्घकालीन श्वसन आणि मज्जासंस्थेचे नुकसान होऊ शकते.व्यावसायिक सुरक्षा आणि आरोग्य प्रशासनाने आठ तासाच्या वेळेच्या सरासरीपेक्षा (टीडब्ल्यूए)२५ पीपीएमवर अमोनियासाठी परवानगी योग्य एक्सपोजर मर्यादा निश्चित केली आहे. दयानंद विज्ञान महाविद्यालयातील भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी वैज्ञानिक नवोपक्रमात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल व पेटंट मिळाल्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,सचिव रमेश बियाणी,दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजेंद्र चौधरी यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सर्व संशोधक प्राध्यापकांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा कोल्हापुरात निषेध; इंडिया आघाडीची निदर्शने

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वकील राकेश किशोर यांनी केलेल्या हल्ल्याचे पडसाद मंगळवारी देशभरात उमटत आहेत. कोल्हापुरात इंडिया आघाडीच्या वतीनं शिवाजी चौकात निदर्शने करण्यात आली. 'मोदी सरकार चले जाओ', 'हल्ला करणाऱ्या मनुवादी विचारसरणीचा धिक्कार असो' अशा घोषणांनी इंडिया आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला.

वकील राकेश किशोर यांनी केला हल्ला : भारतीय न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च स्थान असलेल्या सर्वोच्च न्यायालयात एका सुनावणीदरम्यान वकील राकेश किशोर यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वस्तू भिरकावल्याचा प्रकार सोमवारी घडला. या घटनेच्या विरोधात देशभरात प्रचंड संतापाची लाट पसरली आहे. राज्यातील विविध पक्षांनी या घटनेचा धिक्कार केला. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांनी राज्यात ठिकठिकाणी निषेध दर्शवून केंद्रातील भाजपा सरकारवर टीकेची जोड उठवली आहे.

कोल्हापुरातील शिवाजी चौकात निदर्शने : सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडिया आघाडीच्या वतीनं शिवाजी चौकात निदर्शनं करण्यात आली. यावेळी केंद्र सरकार आणि मनुवादी विचार जोपासणाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तर सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्रींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला जाण्यास नकार दिल्याच्या रागातूनच वकील राकेश किशोर यांनी हा प्रकार केल्याचा दावा कम्युनिस्ट पक्षाचे माजी राज्यसचिव उदय नारकर यांनी केला.

'कोल्हापुरात सर्किट बेंच स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यामागं संपूर्ण देश खंबीरपणे उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार दडपण्याचा प्रकार सहन केला जाणार नाही,'' असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सहसंपर्क प्रमुख विजय देवणे यांनी दिला. यावेळी कम्युनिस्ट पक्षाचे माजी सचिव उदय नारकर, माजी महापौर आर. के. पवार, भारती पवार, डी. जी. भास्कर, सुभाष देसाई, कॉम्रेड चंद्रकांत यादव, रघुनाथ कांबळे, विशाल देवकुळे, राजू यादव यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


# लातुरात झालेल्या ५ पैकी ३ आत्महत्या आरक्षणासाठी नव्हत्या: पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांची माहिती

## तरुणांच्या मृत्यूनंतर जवळच्या व्यक्तींनी ठेवल्या बनावट सुसाइड नोट; ५ जणांविरोधात गुन्हे

**लातूर/प्रतिनिधी :** मागील दीड महिन्यात लातूर जिल्ह्यात झालेल्या ५ आत्महत्यांपैकी ३ आत्महत्या आरक्षणासाठी झाल्या नसल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रत्येक घटनेतील मृत व्यक्तींच्या खिशात सुसाइड नोट सापडली होती आणि प्रत्येकात आपण आरक्षणासाठी आत्महत्या करत असल्याचा मजकूर लिहिलेला होता. परंतु पोलिस तपासात या सुसाइड नोट बनावट असल्याचे सिद्ध झाले असून हस्ताक्षरतज्ज्ञांनी दिलेल्या अहवालानंतर मृतांच्या खिशात सुसाइड नोट ठेवणाऱ्या पाच जणांविरोधात चाकूर,अहमदपूर आणि निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांनी दिली.

गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये एका पत्रकाराचाही समावेश आहे. या पाचही आत्महत्यांच्या घटनांची पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद करुन तपास सुरू केला होता. यातील अहमदपूर, चाकूर आणि निलंगा तालुक्यात झालेल्या आत्महत्यांमध्ये अधिक संशय बळावल्यामुळे या सुसाईड नोट हस्ताक्षर तज्ज्ञांकडे पाठवण्यात आल्या. तपासात हे अक्षर मृत तरुणांचे नसल्याचे आढळून आले. त्यामुळे घटनेच्या वेळी मृत तरुणांजवळ असलेल्या संशयित व्यक्तींची हस्ताक्षरे तपासण्यात आली. त्यामुळे सुसाइड नोट ठेवणाऱ्या पाच जणांविरोधात चाकूर, अहमदपूर आणि निलंगा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक तांबे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**आरक्षणासाठी दबाव टाकल्याचा ठपका**

शासनाला चुकीची माहिती देणे, आपल्या समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी शासनावर दबाव टाकण्याच्या उद्देशाने तसेच शासनाकडून आर्थिक मोबदला मिळवून फसवणुक करण्याच्या हेतूने खोटी व बनावट चिठ्ठी तयार करुन, ती मृत व्यक्तीने लिहिल्याचे भासवणे. जाणीव पूर्वक बनावट दस्तावेज तयार करुन तो खरा असल्याचे दर्शवून पोलिसांना खोटी माहिती दिल्याचा ठपका ठेवत पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे तांबे यांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार चाकूर तालुक्यातील हणमंतवाडी तांडा येथे अनिल बळीराम राठोड हे घराला पाणी मारत असताना शॉक लागून त्यांचा १४ सप्टेंबर २०२५ रोजी मृत्यू झाला होता. परंतु त्यांच्याजवळही एक सुसाइड नोट सापडली आणि त्यात बंजारा समाजाला आरक्षण मिळत नसल्यामुळे आत्महत्या करत असल्याचा मजकूर लिहिलेला होता. चौकशीअंती हा मजकूर त्यांचे नातेवाईक शिवाजी फत्तू जाधव याने नरेंद्र विठ्ठल जक्कलवाड व तानाजी मधुकर जाधव यांच्याशी संगनमत करून नरेंद्र विठ्ठल जक्कलवाड यांनी लिहून घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी चाकूर पोलिसांत तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.



पोलिसांनी सांगितले की, निलंगा तालुक्यातील दादगी येथील शिवाजी वाल्मीक मेळ्ळे यांचा घरातील इलेक्ट्रिक शेगडीला हात लागल्यामुळे १३ सप्टेंबर २०२५ रोजी मृत्यू झाला होता. त्यांच्या जवळही एक सुसाइड नोट सापडली. त्यात माझ्या मुलांना महादेव कोळी समाजाचे प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे मी आत्महत्या करत असल्याचे लिहिले होते. या प्रकरणाचा हस्ताक्षरतज्ज्ञांनी अहवाल दिला तेव्हा ते अक्षर पत्रकार महादेव पिटले याचे असल्याचे समोर आले. चौकशीअंती, ही चिठ्ठी महादेव पिटले यांनी लिहिली आणि मृत तरुणाच्या खिशात ठेवल्याचे समोर आले. या प्रकरणात निलंगा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अहमदपूर तालुक्यातील सिंदगी येथील रहिवासी बळीराम श्रीपती मुळे यांनी विष प्राशन केल्याची घटना घडली होती. नंतर उपचारादरम्यान ते वाचले. परंतु ते अत्यवस्थ असताना त्यांच्या खिशात सुसाइड नोट सापडल्याचा दावा त्याचा चुलत भाऊ संभाजी ऊर्फ धनाजी भिवाजी मुळे यांनी केला होता. या चिठ्ठीत मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मी आत्महत्या करत असल्याचा उल्लेख होता. तपासादरम्यान, हस्ताक्षरतज्ज्ञांनी हे अक्षर आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या तरुणाचे नसून त्याचा चुलत भाऊ संभाजी ऊर्फ धनाजी भिवाजी मुळे याचे असल्याचा अहवाल दिला. त्यामुळे अहमदपूर पोलिसांत त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## श्रीकृष्ण महाविद्यालयाचा उत्कृष्ठ संयोजनाबद्दल गौरव

धाराशिव(प्रतिनिधी)-डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय अविष्कार स्पर्धेत श्रीकृष्ण महाविद्यालयाचा जिल्हास्तरीय उत्कृष्ठ संयोजनाबद्दल प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्यासह समन्वयक डॉ.राम कदम यांचा गौरव करण्यात नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दिवाळीनंतर स्पर्धा होणार आहे. विद्यार्थ्यांचा नाविन्यपूर्ण कल्पना व प्रयोगांना वाव देण्या-या संशोधकांच्या 'आविष्कार'चे आयोजन नुकतेच करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या संशोधन व जिज्ञासूवृत्तींना प्रोत्साहन देण्यासाठी राजभवनच्या वतीने राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. त्यापूर्वी ही विद्यापीठस्तरीय स्पर्धा घेण्यात आली. विद्यापीठाच्या नाटयगृहात शनिवार स्पर्धेचा समारोप व पारितोषिक उद्योजक विवेक देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्रकुलगुरु डॉ.वाल्मिक सरवदे होते . यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ .गजानन सानप, प्राचार्य भारत खंदारे, 'आविष्कार'चे समन्वयक डॉ.भास्कर साठे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे यांची उपस्थिती होती. दोन दिवस या प्रयोगांचे सादरीकरण नाटयशास्त्र विभागातील नवीन सभागृहात झाले . मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी घेण्यात आलेल्या जिल्हा स्पर्धेतून निवडण्यात आलेले सहा गटातून ६२१ संशोधक स्पर्धेत सहभागी झाले. *जिल्हा यजमानांचा गौरव* युवक महोत्सवाप्रमाणेच अविष्कार स्पर्धा यंदापासून जिल्हानिहाय घेण्यात आली.

१० ते २३ सप्टेंबर या काळात प्रत्येक जिल्हयात करण्यात आले. जिल्हानिहाय हि स्पर्धा छत्रपती संभाजीनगर जिल्हा- मुक्तानंद महाविद्यालय , गंगापूर : १० सप्टेंबर,जालना जिल्हा- लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर १३ सप्टेंबर , बीड जिल्हा- स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय १८ :सप्टेंबर धाराशिव जिल्हा- श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी , ता. उमरगा: २३ सप्टेंबर या प्रमाणे करण्यात आली. या महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य प्राचार्य डॉ.रामराव चव्हाण , डॉ भारत खंदारे, डॉ.सुहास मोराळे, डॉ.गुलाब राठोड यांच्यासह आविष्कार समन्वय कडॉ.बी टी पवार , डॉ.राम कदम, डॉ.शैलेंद्र शेलार यांचा समारोपप्रसंगी गौरव करण्यात आला.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रासाठी १३ ऑक्टोबर रोजी विशेष सभांचे आयोजन

धाराशिव (जिमाका) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुसार) नियम,२०२५ जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्याकरिता सोडत पध्दतीने कार्यवाही करण्यासाठी विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात येणार आहे.

यासाठी खालील ठिकाणी विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे.सभेची तारीख १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आहे.धाराशिव जिल्हा परिषद स्थळ : कै.वसंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद,धाराशिव,पंचायत समिती, भूम,स्थळ :क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले सभागृह,भूम,पंचायत समिती, वाशी,स्थळ : तहसील कार्यालय, वाशी. पंचायत समिती,कळंब,स्थळ : पंचायत समिती सभागृह,कळंब, पंचायत समिती धाराशिव,स्थळ : जिल्हा नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव. पंचायत समिती,परंडा,स्थळ : तहसील कार्यालय सभागृह,परंडा. पंचायत समिती तुळजापूर,स्थळ : पंचायत समिती सभागृह,तुळजापूर. पंचायत समिती,लोहारा,स्थळ : पंचायत समिती सभागृह,लोहारा आणि पंचायत समिती,उमरगा, तहसील कार्यालय,उमरगा बैठक, सभागृह येथे विशेष सभा होणार आहे. आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी/तहसीलदार यांच्याकडे हरकती व सूचना १४ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सादर कराव्यात.

## ज्ञानप्रकाश सामाजिक प्रतिष्ठानने जाणून घेतल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अडचणी

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यातील २५ हजार लोकसंख्येच्या पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील विविध समस्या आणि सुविधांबाबत ज्ञानप्रकाश सामाजिक प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत बडे यांच्याशी सविस्तर संवाद साधून चर्चा केली. या चर्चेदरम्यान प्रतिष्ठानने अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या, ज्यात प्रामुख्याने बंद असलेला शवविच्छेदन कक्ष तात्काळ सुरू करावा, रुग्ण कल्याण समितीच्या नियमित बैठका घ्याव्यात आणि सर्व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहावे, अशा सूचनांचा समावेश होता.

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये न्यू एज अल्पमुदत अभ्यासक्रम

धाराशिव (जिमाका)-कौशल्य विकास,उद्योजकता, रोजगार व नाविन्यता विभागाच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित न्यू एज अल्पमुदत अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत.

दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन होणार असून, याअंतर्गत राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व १४९४ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण २ हजार ५०६ तुकड्यांमध्ये प्रशिक्षण सुरू होणार आहे.

या अल्पकालीन अभ्यासक्रमांच्या पहिल्या तुकडीचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण (Live Streaming) तसेच अल्पमुदत व्यवसाय अभ्यासक्रमांचे उदघाटन कार्यक्रम जिल्ह्यातील सर्व शासकीय औद्योगिक संस्थांमध्ये पार पडणार आहे.

हा कार्यक्रम पालकमंत्री, खासदार, आमदार व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला असून,जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,धाराशिव यांनी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## सैनिक मुलांचे वसतिगृह,येथे सहाय्यक अधीक्षक पदासाठी अर्ज मागविणे सुरू

धाराशिव (जिमाका)- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत असलेल्या सैनिक मुलांचे वसतिगृह,धाराशिव येथे तात्पुरत्या स्वरूपात सहाय्यक वसतिगृह अधीक्षक हे पद एक वर्षाकरिता मानधनावर भरण्यात येणार आहे.यासाठी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र माजी सैनिक (JCOs) - माजी सुभेदार,सूबेदार मेजर यांनी अर्ज सादर करावेत,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

अर्जदारांनी आपले मूळ कागदपत्रांसह (स्वतःचे डिस्चार्ज बुक, पीपीओ,माजी सैनिक ओळखपत्र व इतर शैक्षणिक कागदपत्रे) दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे प्रत्यक्ष सादर करावेत.तपासणीनंतर त्याच दिवशी दुपारी ११ वाजता मुलाखत घेण्यात येईल.अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ किंवा ७५८८५२७५५४ वर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

## शस्त्र कायद्यांतर्गतगुन्हा नोंद

आंबी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रदीप रा. आनाळा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०५.१०.२०२५ रोजी आनाळा येथे आपल्या राहत्या घरी लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी सोनेरी रंगाची मुठ असलेली तलवार अंदाजे १,५०० किंमतीची विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला आंबी पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी प्रभुराम नवनाथ कातुरे पोलीस अंमलदार नेमणुक पोलीस ठाणे आंबी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४, २५ अन्वये आंबी पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## कोजागिरी पौर्णिमेच्या चंद्रदर्शनात रसिकांनी घेतला कविता व गीतांचा आनंद...

मुरूम (सुधीर पंचगल्ले) येथील बसव सहकार भवनमध्ये कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था, महात्मा बसवेश्वर सार्वजनिक ग्रंथालय व रोटरी क्लब मुरूम सिटी यांच्या सयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. ६) रोजी कोजागिरी काव्य मैफिलचे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे होते. यावेळी रोटरीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, सचिव कलाप्पा पाटील, माजी पोलीस उपनिरीक्षक राम कांबळे, माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गुंडेराव गुरव यांनी स्वागत गीतातून पाहुण्यांचे स्वागत केले. विविध घटना, प्रसंग, वास्तव जीवनावर आधारित यावेळी कविवर्य सहशिक्षक रुपचंद ख्याडे यांनी प्रीतीचं चांदणं...तुझे सोबत असणे, माझ्यासाठी आहे पुरे, दूर नको जाऊ कधी, मन तुझ्याचसाठी झुरे, सहशिक्षक नागनाथ बदोले यांनी आठवणीतली बाटली...,शिवशरण वरनाळे यांनी दगडाचा देव मानवा तू शोधलास दगडात देव...,कलाप्पा पाटील यांनी आपण सारे पाहू लागलो धो धो पाऊस पडताना कोणीन शेतकऱ्या त्या बांधावरती रडताना...,रक्ताळा !.. रात्रच जणू झाली मृत्यूचा नाच, भिजलेल्या थडग्यात पेटला काच, पावसाचा प्रत्येक थेंब हा पावसाळा, जीव देतो की घेतो ? हा तर रक्ताळा... ही कविता सुनील राठोड यांनी गायली. पत्रकार अजिंक्य मुरुमकर यांनी मृत्यू कधीच जिंकत नाही, मृत्यू सत्य बदलू शकत नाही...,डॉ. नितीन डागा यांनी रिमझिम गिरे सावन सुलग सुलग जाये मन...अमोल कटके यांनी जगून घ्यावी प्रत्येक भूमिका आयुष्याच्या रंगमंचावर, एकदा की पडदा पडला की पुन्हा प्रवेश नाही... प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी हिरकणी...गोपनारी हिरकणी गडा गेली, दूध घालाया परत झणी निघाली, पायथ्याशी ते वसे तीचे गाव, घरी जाया मन घेई पार धाव... बाळासाहेब गिरीबा यांनी माणुसकी चा झरा दुःख आपल्या वाट्याचा आपणच भोगायच असतं.. कांबळे यांनी हिंदीमधून रचना सादर आदींनी कविता सादर करुन श्रोत्यांची मने जिंकली. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ निर्मळे, प्रा. शिवाजी राठोड, प्रा. राजकुमार वाकडे, मल्लिकार्जुन बदोले, संचालक अशोक जाधव, अमृत वरनाळे, मनीष मुदकन्ना, शिवशंकर स्वामी, प्रा.भूषण पाताळे, बालाजी व्हनाजे आदिंची विशेष उपस्थिती होती. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, दत्तात्रय इंगळे, राम कांबळे, प्रा. डॉ. महेश मोटे यांनी मनोगत व्यक्त केले. शिवशरण वरनाळे यांनी अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, कविवर्यांनी सादर केलेल्या कवितेमागे विशिष्ट भावना, अनुभव व विचार असतो. कवितेतील शब्द, प्रतीकं आणि रूपकं यांचा वापर करून कवी त्या भावनांना व्यक्त करत त्यांनी गंधाळलेले शब्द...रंग रूप गंधात शब्द न्हाऊन निघती, शब्द अवतरती शब्दांची बरसात होती माझी कविता... शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे, चिदानंद स्वामी, प्रशांत काशेट्टी, सचिन कंटेकूरे, राजू मुदकण्णा, महांतय्या स्वामी, संतोष मुदकण्णा आदींनी पुढाकार घेतला. या काव्य मैफिलचे प्रास्ताविक संतोष कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन सहशिक्षक बालाजी भोसले तर आभार कलाप्पा पाटील यांनी मानले.

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून बांधून ठेवणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, समीर मियाँ शेख, वय ३७ वर्षे, रा.धाराशिव प्रशाला जवळ सांजा वेसगल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव व महिंद्र बोलेरा पिकअप चा चालक यांनी दि.०५.१०.२०२५ रोजी येरमाळा चौरस्ता ब्रिज येथे महिंद्र पिकअप मध्ये गोवंशीय जातीचे ४ जर्सी गायी व १० वासरे व महिंद्र बोलेरा पिकअप क्र एमएच ११ एजी ४६१३ मध्ये गोवंशीय जातीचे ४५ वासरे एकुण १,७०,००० किंमतीचे वाहनासह ९,७०,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे गायी व वासरे त्यांचे तोंड व चारही पाय बांधुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन वाहतुक करत असताना येरमाळा पोलीसांना मिळून आले.

यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ए), ११(१) (डी), ११(१)(के), ११(१)(आय) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५, ५(ए), ५(बी), ९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कार्य**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक 13-2025-SrDENCo. कामाचे नाव:- i)** TKWD येथे प्रस्तावित कोचिंग देखभाल डेपो (फेज-१) **ii)** TKWD येथे इलेक्ट्रिक लोकोमोटिव्हच्या तपासणी आणि देखभालीच्या कामासाठी ट्रिप देखभाल/ॲडव्हान्स तपासणी केंद्रांची निर्मिती. **कामाची अंदाजे किंमत:-** रु.३८,३०,५५,०८५.४८/- **बयाणा रक्कम:-** रु. २०,६५,३००.००/- **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने. **देखभाल कालावधी:-** १२ महिने. www.ireps.gov.in **वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ:-** 13-2025-SrDENCo- २४/१०/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in** वर **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:-** 13-2025-SrDENCo - २४/१०/२०२५ रोजी १५.३० वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो. वेबसाइट: **www.ireps.gov.in.** ANJ-59

तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा



**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change
My Name which was : **Gayatridevi Pravinrao Gholap**
To:**Gayatridevi Pravin Gholap**
Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **Gayatridevi Pravin Gholap** will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **Gayatridevi Pravinrao Gholap**
NEW NAME:- **Gayatridevi Pravin Gholap**
Address :- Terkheda Ta-Washi Dist-Osmanabad. -413525
Adhar no.-365804174439 Mob. No.-9890510068



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396



हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर धाराशिव (उस्मानाबाद) येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,DHARASHIV(Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649